दिवाळी अंक २ रा
स्वागत मूल्य ५० रु.
२०१८ / १९

ISSN 2349-8447

ज्ञानग्रुप परिवारातर्फे

# ज्ञानमुद्रा

एक कल्पनेची पहाट





कल्की- आपली नवीन दिशा



**तुम्ही देवावर विश्वास तेंव्हाच ठेवाल जेव्हा तुम्ही स्वतःवर विश्वास ठेवाल....**

.... स्वामी विवेकानंद


- ★ दशावतार,
- ★ कल्की अवतार - आपल्याला पाहिजे का ?
- ★ फुल्लस्टॉप - पासून लवकर सावध होऊया.



शुभ दीपावली

www.dnyangroup.com

- ★ देवाला सोन्याची गरज आहे का?
- ★ ज्ञानराज्या -एक राज्य, एकत्र राज्य.
- ★ गडहिंग्लज,चंदगड, आजरा पर्यटन.


जय जवान
जय किसान !




|| पवित्र आत्मा जेव्हा जन्म घेतो, तेव्हा अनेक आत्मे त्याला जोडले जात असतात, चांगले आणि वाईट ज्यांच्या त्यांच्या विचारा प्रमाणे ते त्या आत्म्याला मदत व त्रास देत असतात. पण जेव्हा हा पवित्र आत्मा स्वताला ओळखतो आणि परमेश्वराने दिलेल्या मार्गावर चालतो व नवीन विश्व निर्माण करून पसरलेल्या विषाचे रुपांतर अमृतात करतो तोच खरा विश्वात्मा ... ||

**.....भगवद गीता,बायबल,कुराण,बुद्ध**



**You cannot believe in God...until you believe in yourself.**

**Swami Vivekananda**



**In a gentle way,you can shake the world.**

**Mahatma Gandhi**



**Small Aim is Crime,have a great Aim…**

**Dr.A.P.J.Abdul Kalam**



**Peace Begins with a Smile..**

**.Mother Teresa**

## संपादकीय...

विचार मनात न राहता, जर पोटात तेच ओठात जेंव्हा येतं आणि चांगला संवाद घडतो त्या वेळेस ब्रह्मांडात एक ऊर्जा निर्माण होते व होत असते. परमेश्वर असणे व त्याला आपण नमन करणे जसे सत्य आहे तसेच आपला आत्मा  हा परमात्म्यात विलीन होणे हे सुद्धा सत्य आहे.मन स्वच्छ असेल तर विचार जे हृदयातुन येतील ते मनाला जोडत जातील.

**श्री.रविराज कुपेकर**



# ज्ञानमुद्रा टीम

- रविराज कुपेकर - संपादक
- सीमा कुपेकर - संपादक
- अमर देसाई - संचालक
- महादेव कदम - संचालक
- दिग्वीजय कुराडे - कायदेशीर सल्लागार
- माणिक देसाई - संचालक
- प्रभा मांगले
- मिनल देसाई
- सचिन कुंडले
- दिपक कांबळे

---


*ज्ञानमुद्रा - "एक कल्पनेची पहाट"*

पत्ता:- *ज्ञानग्रुप* ,

*कोल्हापूर* - फ्लॅट न.2, मेथाराम बिल्डिंग,
सर्वे कॉलनी, ताराबाई पार्क,कोल्हापूर.
मो:- रविराज कुपेकर:-9552912142

*गडहिंग्लज* :- कुपेकर हॉस्पिटल, भडगाव रोड,
गडहिंग्लज, कोल्हापूर, महाराष्ट्र.
मो:- 9623615061

ज्ञानमुद्रा अंक मिळण्यासाठी संपर्क करा,
अमर देसाई - 9765826433
महादेव कदम - 9689217413
माणिक देसाई - 9049181694

ई-मेल:- dnyangroup@gmail.com

Online Download : www.dnyangroup.com/dnyanmudraa2018

वेब:- www.dnyangroup.com

FB:- www.facebook.com/dnyangroup

Whatsapp No:- 9923779911

# निर्देशांक

| | |
|---|---|
| दशावतार | श्री.बाळासाहेब कुपेकर |
| The King of Freedom:Kalki | श्री. रविराज कुपेकर |
| मानवी शरीरातील साखरेचा प्रवास | डॉ. अमोल बापूराव जाधव |
| पत्राच उत्तर मिळालंच नाही | ॲड. दिग्वीजय वि. कुराडे |
| सुसंगत | सौ. मधुमती उदय शिंदे |
| व्यसनमुक्ती केंद्राचे अग्रणी - जीवन ज्योती | श्री. अमर देसाई |
| ज्ञानराज्य - एक राज्य, एकत्र राज्य | श्री.रविराज कुपेकर |
| निल हर्बल : आयुर्वेदातील विश्वसनीय नाव | डॉ. हरीश देवरकर |
| राजकीय क्षेत्रातील अशाही संधी | डॉ. शुभांगी माने |
| ग्लोबल वॉर्मिंग : परिणाम व उपाय | श्री.माणिक सागर देसाई |
| आपले दातांचे आरोग्य | डॉ.अंकुश शिंदे |
| मास्तरांचा मार | ॲड. दिग्विजय वि. कुराडे |
| विद्या देवता श्री गणेश देवतायन: महा | श्री. दिलीप पवार |
| एक कदम स्वच्छता से प्लॅस्टीक मुक्ती की ओर | श्री. अमर देसाई |
| गडहिंग्लज,चंदगड,आजरा पर्यटन | डॉ.सतीश उपळकर |

# निर्देशांक


**समाज परिवर्तनासाठी युवकांच्या समोरील आदर्श आणि आव्हाने**


प्राचार्य डॉ. निवास जाधव

**मराठी मातीत रुजतंय कडकनाथाचं(ब्लॅक गोल्ड) वाण! -**

श्री.अरुण कटाळे

# दशावतार

- बाळासाहेब कुपेकर




पृथ्वीच्या पाठीवर मानव प्रजाती लाखो वर्षापूर्वी जन्माला आली. ॲडाम आणि इव्ह हे या पृथ्वीवरचे प्रथम दांपत्य असे मानले जाते. त्यानंतरच पृथ्वीवर निग्रो, मंगोल,आर्य अनार्य,मिश्र वंशीय असे वेगवेगळे वंश निर्माण झाले. त्या त्या ठिकाणांचा भूगोल वातावरण, मग ते बर्फाळ प्रदेशातील, सागर किनाऱ्यावरील,वालकामय प्रदेशातले किंवा जंगल सानिध्यातले असो त्याचा परिणाम मानवाच्या राहण्या,बोलण्या,चालण्यापासून ते दिसण्यापर्येंत झाला. उदा बर्फाळ प्रदेशातील वंश तेथल्या थंडहवेमुळे गोरेपान झाले.उष्ण कटिबंधामध्ये काळे झाले इत्यादी. त्यामधल्या सर्व मानव प्रजाती पृथ्वीच्या पाठीवर पसरल्या. हळू-हळू त्यांनी पृथ्वी व्यापली. जेथे जेथे मानवी वस्त्या होत्या तेथे तेथे सुरवातीला रानटी अवस्थाच होती. नग्नावस्था, दगडांची हत्यारे,जनावरांचे कच्चे मांस,फळे- कंदमुळे खाऊन तो जगत होता.पुढे अग्नीचा शोध अचानक लागल्याने मांस भाजून खाणे,त्यानंतर शिजवून खाणे मानवाला समजले. धातूंचा शोध लागल्यावर त्याच्या हातात हत्यारे आली. हत्यारांचा उपयोग शिकारीपासून स्वंरक्षणासाठी करू लागला . हळू हळू मानव प्रजाती सुधारित होत गेली. टोळ्या टोळ्यांनी मानव समूह राहु लागला. त्यांच्यामध्ये काही नियम पाळले जाऊ लागले .टोळ्या टोळ्यांनी राहणाऱ्या मानव समूहामध्ये" संस्कृती" नांदू लागली. त्या- त्या काळाप्रमाणे, भुगोला प्रमाणे,समुद्र,बर्फ,वालुकामय प्रदेश या सर्व विभिन्न निसर्गाच्या सानिध्यात वेगवेगळ्या प्रकारच्या संस्कृत्या तयार होत गेल्या.

मानव जात पृथ्वीवरील कोणत्याही सजीवापेक्षा बुद्धिवान असल्याने प्रगत होत गेली.खाणे,पिणे,राहणे,एकोपा वाढला इत्यादी प्रकार विकसित होऊ लागले.हक्काची जाणीव झाली.दुसऱ्या टोळ्यांपासून स्वंरक्षणासाठी त्यानी हत्यारे तयार केली,त्याचा वापर होवू लागला . विकास होऊ लागला . जीवन पद्ध्तीत सुधारणा होऊ लागली.त्यातुनच टोळी प्रमुख व त्यातूनच पुढे राजेशाही,सुलतानशाहीचा जन्म झाला .यातच काही सतप्रवृतिचे,प्रगत बुद्धीवादी, साधूतुल्य, संयमी, दयाबुद्धीचे थोर पुरुषही जन्माला आले.

त्यामध्ये येशुख्रिस्त,महंमद पैगंबर, झरतुष्ट,राम,कृष्ण,बुद्ध ,गुरुनानक इत्यादी महापुरुष जन्मले.भरकटलेल्या,विस्कटलेल्या समाजाला त्यांनी वळण लावले .त्यामधूनच ग्रिक, रोमन, आर्यन अशा संस्कृत्या पृथ्वीवर नांदू लागल्या .अचंबित करणारी शिल्पे मानवाने तयार केली .इजिप्त मधील पिरॅमिडस हे या संस्कृतीचे उदाहरण आहे. हडप्पा-मोहेंजोदडो उत्खन,बौद्ध शिल्पे,अजंठा-वेरूळ,अफगाणीस्तानमधील बुद्धांचे शिल्पे इत्यादी काही उदाहरणादाखल...!हडप्पा-मोहेंजोदडो येथली भारतीय संस्कृती उत्खनानंतर जगासमोर आली. आज हा प्रदेश पाकिस्तानात असला तरी मूळ भारत त्या पलीकडे होता.सिंधू नदीकाठची संस्कृती त्यामुळे सिंधू संस्कृती म्हणून ओळख जगाला आहे. यातूनच पुढे भार तात "हिंदू" हा शब्द येथल्या मानव समूहासाठी वापरला जाऊ लागला. हि संस्कृती पाच हजार वर्षापूर्वीची आहे. कंबोडिया, फिलिपिन्स, थायलंड, मलेशिया, ब्रम्हदेश, भूतान, नेपाळ, श्रीलंका, आताचे पाकचे दोन तुकडे फिलिपिन्स, अफगाणिस्थान पर्यंत ही हिंदू संस्कृती पसरली होती.पुढे मध्यवर्ती सत्ताकेंद्र प्रबळ नसल्याने या संस्कृतीचा तेथे तेथे ऱ्हास झाल्याचे दिसते .

"हिंदू" या शब्दावरून भारत या उपखंडाला हिंदुस्थान म्हणून ओळखले जाऊलागले. त्याच बरोबर भरत राजाच्या नावाच्या पराक्रमी सम्राटावरून या देशाला भारत ही म्हटले जाऊ लागले.आजही म्हणतात. हिंदूस्थानात राहणारा  हिंदू. त्याचेच रुपांतर हिंदुधर्मीय असे झाले.या धर्माला इतर धर्मियांप्रमाणे कोणी संस्थापक नव्हता .ती एक जीवन पद्धती,विचारपप्रणाली होती.प्रवाहित,लवचिक अशी ती असून तिला भक्कम अशी धार्मिक चौकट नव्हती.जगातल्या सर्व चांगल्या विचारांचे हिंदूनी स्वागत करून स्वीकारही केला.शक,हूण ,कुशाणांच्या टोळ्यांनी देशामध्ये बाहेरून येऊन आक्रमण केले पण ते तिथे स्थिरावले.आर्य वंशीयही असेच बाहेरुन आले . ते शक-हुणांच्या अगोदरच स्थिरावले.कधी हे सर्व वंश एकमेकांत मिसळले  व येथल्या द्रविड संस्कृतीने त्यांना जवळ केले हे कळलेच नाही . वांशिक मिलाफ येथे दिसून येतो सर्वधर्म समभाव,सहिष्णुता,परमेश्वरी अस्तित्वाचा स्वीकार,सद्‌गविचारावर आधारित असा एक संस्थापकरहित धर्म सर्व हिंदुस्थानात नांदू लागला . त्या विचारधारेलच "हिंदू" असे म्हंटले गेले . इतर धर्मातील कडवेपण हिंदूमध्ये नाही .

पुढे हिंदू जीवन पद्धती,विचारधारा हे सर्व बाजूला सारले गेले व हिंदूंचा तो हिंदुधर्म म्हणून ओळखला जाऊ लागला . मूळ ह्या संस्कृतीचा जन्म सात हजार वर्षांपूर्वी झाल्याचे दाखले ,पुरावे मिळतात .याच कालखंडात ॠग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद,सामवेद या चार वेदांची निर्मिती झाली.ॠग्वेद ह्या ग्रंथाला  अपौरुषेय असे मानले गेले आहे. मानवाने तो निर्मिला नसून प्रत्यक्ष परमेश्वराच्या मुखातून त्याची निर्मिती झाली आहे; असे आजही मानले जाते. त्याची रचना , त्यातले श्लोक,ॠचा ॠग्वेद वाचल्या वरच पटते. माणूस ते वाचून अवाक् होतो..

"श्रुती" अशा शब्दाने त्यांना संबोधतात उपनिषदांना "स्मृती " असे म्हणतात. कठोपनिषद हे त्यामध्ये प्रमुख उपनिषद..! श्रुती- स्मृती नंतरच पुराणांची निर्मिती झाली . भाकडकथा,खरे -खोटे त्यामध्ये अधिक "तुमचा शब्द म्हणजे वेद वाक्य का?"वेदांची थोरवी या वाक्यात आहे.मात्र " पुराणातली वांगी पुराणातच!"असे पुराणाबद्दल  सहज बोलले जाते."पुरे तुझे पुराण" असाही उच्चार ऐकु येतो.मतलबी लोकांनी अनेक भाकडकथा स्वार्थासाठी त्यामध्ये भरून लोकांना अंधश्रद्ध बनवायचा धंदा केला.आजही श्री.सत्यनारायणाच्या पूजेत साधूवाण्याची बोट अनेक वेळा बुडते व वर येते, तसेच राजाची मरून पडलेली मुले जीवंत होतात अशा सुरस कथा पुरोहित ऐकवतो.हा पक्का गोरखधंदा आहे .पण लक्षात कोण घेतो? या व अशा सर्व संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर हिंदू धर्म दहा अवतारां च्या रूपाने मानवकल्याणासाठी देव अवतार धारण करून आला असे आजही मानतो. देशभर दशावतार प्रचंड लोकप्रिय आहे . त्यावर नाटकं होतात . नाटक कंपन्या चालतात, दशावतारामध्ये मत्स्य (मासा) , कूर्म ( कासव ), वराह ( डुक्कर ), श्री राम, श्री कृष्ण, परशुराम, वामन, बौध्द, नरसिंह व कल्की (कली) हे दहा अवतार आहेत. पृथ्वी ,सूर्य , चंद्र,तारे ,वायू जल याची निर्मिती निर्मात्याने मानवासाठी केली . पृथ्वी, तेज,आप(पाणी),वायू व अवकाश (पोकळी ) यांना पंचमहाभूते म्हणतात प्रत्येक सजीव ती धारण करतो . विश्वाचा प्रचंड पसारा ,ज्याला ब्रम्हांड म्हंटले जाते, अनंत अनंतरावर असणारे तारे,ग्रह आकाशगंगा या मागे कोणीतरी असलेच पाहिजे.सर्वच फिरता अधांतरी दरबार!लाखो प्रकाशवर्ष अंतरावरील फैलवलेले विश्व याचा निर्माता,अभियंता तो परमेश्वर अशी हिंदू मनाची धारणा आहे

प्रकाश वर्षाचा हिशेब कोणी कधी नीट केलं आहे ? 297000*60*60*24 *365............दिवस= ? कि.मी एवढे अंतर म्हणजे एक प्रकाश वर्ष.

**1 प्रकाशवर्ष** =प्रकाशाचा सेकंदाचा वेग 297000 कि.मी(दोन लाख सत्याण्णव हजार )इतका आहे . एकूण एक वर्षातील प्रकाशाचा वेग म्हणजे प्रकाशवर्ष. वरचा गुणाकार करून बघा. अशा लाख-लाख प्रकाश वर्षे (light years) अंतरावर ग्रह तारे आहेत कोण याचा निर्माता?शेवटी उत्तर एकच!

अब्जावधी वर्ष चंद्र ,सूर्य ,पृथ्वी,एका संतुलनातच फिरतात. थोडे जर कोण ढळले तर विनाशाच!या संतुलनाचा अर्थ काय? साधु पुरुषांनी या सर्वाचा अर्थ सांगावयाचा प्रयत्न केलं . सर्वांच्या संतुलीत परिक्रमा,स्वतः बरोबर दुसऱ्याभोवती योग्य अंतर ठेऊन अब्जावधी वर्षे फिरत राहणे,याचे उत्तर शोधावयाचा प्रयन्त अनेक विभूतींनी केला आहे.अनेक सत्पुरुषांनी परमेश्वराशी बोलायचा,त्याला पाहिल्याचा दावा केला आहे . परमेश्वरी स्वरूप समजून साधू संतानी त्यांची पूजा करावयास सांगितले.म्हणूनच हिंदू माणूस सूर्यपूजा,गायत्री मंत्रोच्चार करतो भूमिपूजन ,पाणी पूजन , चंद्रपूजन ,नवग्रह पूजन निसर्गातल्या झाडा,फुलांचे,पशु पक्षांचे पूजन यामध्येच हिंदुमानाने परमेश्वर पाहिला आहे .

मानवकल्याणाच्या भावनेतून परमेश्वर पृथ्वीवर अवतरतात अशी हिंदूंची ठाम भावना आहे . ज्या ज्या वेळी येथे अधर्म वाढतो त्या त्या वेळी मी जन्म घेतो दुष्टांचे निर्दालन करतो , साधूंचे रक्षण करतो असे श्री कृष्ण अर्जुनाला उपदेश युद्धभूमीवर करतात .

|| "यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे" ||

जेंव्हा जेव्हां धर्माला ग्लानी येते तेंव्हा तेंव्हा धर्म रक्षणासाठी मी जन्म घेतो,
साधुंचे रक्षण,दृष्टांचा संहार करण्यासाठी मी पुन्हा पुन्हा जन्म घेतो....
"अर्जुना तू लढ ! तोच तुझा , क्षत्रियाचा धर्म आहे"
||"हतो वा प्राप्यसि स्वर्गम्, जित्वा वा भोक्ष्यसे महिम्।
तस्मात् उत्तिष्ठीत कौंतेया युद्धाय कृतनिश्चय: ... " ||

युद्धात मेलास तर स्वर्गप्राप्ती होईल .जिंकलास तर पृथ्वीचे राज्य भोगशील म्हणून युद्धाचा कठोर निश्चय करून तू उठ !युद्ध कर !"|श्रीमद भगवदगीतेतला हा उपदेश अर्जुनाला करून लढावयास लावणारे श्री कृष्ण एक अवतार म्हणूनच सारा हिंदुस्तान त्यांची पूजा करतो.समोर शत्रूसैन्यातले बंधु, आजोबा,गुरु,काका,सगेसोयरे,मित्र, पाहून अर्जुन श्री.कृष्णांना "यांना मरून मला पृथ्वीचे राज्य मिळाले तरी नको" असे म्हणतो.त्यानंतरच श्री.कृष्ण अर्जुनाला लढावयासाठी उपदेश करून प्रवृत करतात. युद्धात मेल्यास तर क्षत्रीयाला ते स्वर्गाचे दार उघडल्यासारखे असते असही सांगतात. अद्‌वितीय, तत्वज्ञान, श्रीकृष्णानी गीतेद्‌वारे सांगितले आहे. आणि त्यानंतरच या भूमीवर महाभारत घडले. त्यामध्ये सत्यधर्मिय पांडवानी श्रीकृष्ण आशिर्वादाने विजय प्राप्त केला व अधर्म संपुष्टात आणला.श्रीकृष्णांना हिंदू लोक अवतारी पुरुष मानतात.

श्रीकृष्ण अवतारापूर्वी श्रीरामांचा जन्म झाला. श्री रामायणाचा काल पाच हजार वर्षापूर्वीचा व महाभारताचा काल तीन हजार वर्षापूर्वीचा आहे असे मानतात . या सर्व काळात हिंदुमन आहे तसेच सश्रद आहे.

दशावतारातील पहिला मानवी अवतार श्री.रामांचा अजोड पराक्रम, उत्तरेतल्या अयोध्ये पासून दक्षिणेतल्या रामेश्वरापर्यंत पायी भाऊ लक्ष्मण व पत्नी सीतेसह जाऊन परदेशातल्या लंकेतल्या रावणाला पराभूत करणे ही सामान्य गोष्ट नाही.एक वचनी,एक बाणी,एक पत्नी हे प्रभू श्रीरामांचे ब्रिद..! काळ कोणता आणि संस्कृती किती उच्चकोटीची..!!अर्धे जग त्याकाळी नग्नास्थेत होते. रामांसारखा राजा पुन्हा होणे नाही. पित्याच्या शब्दाखातर १४ वर्ष वनवासात जाणे, ना सैन्य,ना कोणते बल आणि तेही अयोध्या ते लंका हा पायी प्रवास..! डोंगर, दऱ्या,जंगल,जागोजागी राक्षशी वृत्ती त्रास देत होत्या तरीही प्रभू राम जिंकले.वाईट वृतीचा पराभव झाला.लोक आजही रामराज्य यावे असे म्हणतात. श्री रामावतारावर लिहावयाचे म्हंटले तर एक महाग्रंथ होईल.श्री.राम मंदिरे देशभर आहेत. याचे कारण ते देवअवतार होते.

श्री राम-कृष्ण यांच्या अवतारापूर्वी पृथ्वीवर माशाचा प्रथम जन्म पाण्यामध्ये झाला.अमीबा हा प्रथम जीव असे जगातले शास्त्रज्ञ मानतात. हा अमीबा माशामध्ये रुपांतरीत होवू शकेल का?डार्विनचा उत्क्रांतीवादाचा सिद्धांत थिटा वाटतो.अमीबा ते मासा हा प्रवास होऊ शकत नाही.त्यामुळे पृथ्वीच्या सारीपटावर परमेश्वराने मासा अचूक ठेवला असावा.

माशानंतर कुर्मावतार म्हणजे कासव अवतार ! माशाचे रुपांतर कठीण पाठीच्या कासवामध्ये होईल का? पुन्हा डार्विन सिद्धांत थिटा: कासवाला हिंदू मंदिरामध्ये परमेश्वराकडे शांतपणे पाहत बसावयाचे काम हिंदुनी लावले. त्याचे कारण कुर्म अवतार आहे. पण देव नाही म्हणून देवाजवळ स्थान न देता देवासमोर त्याला ठेवले आहे.कासव चतुष्पाद झाले. थोडे जमिनीवर व अधिक पाण्यात असा जीवनक्रम.यातूनच पुढे वराह हा अवतार परमेश्वराला सुचला असावा. चतुष्पाद पण जमिनीवर जीवनक्रम.

यातुनच पुढे प्राणीसृष्टी पृथ्वीवर निर्माण झाली.नाना प्रकार, नाना रंग, नाना आकृत्या यांची रेलचेल झाली. सुष्ट-दुष्ट स्वभाव सर्व प्राण्यांमध्ये आले. नर- मादी सर्व सृष्टीत निर्माण झाले.चर प्राण्यामधील मादीच्या अंगी वात्सल्याचा भाव निर्माण झाला.निर्माण झालेल्या जीवाला आपली माता जन्म झाल्याबरोबर कळाली. छोट्या जीवाला आपले उदर-भरण लगेच कळाले.यालाच परमेश्वरी किमया म्हणावी लागेल.

मत्स्य,कुर्म,वराह, या तिन्ही अवतारात फक्त कासवच पुजनीय ठरले. सारीपाटावरील सोंगट्या प्रमाणे सर्व चर-अचर कोणीतरी आणून ठेवले असे वाटण्या सारखे. प्राणी-पक्षी,जलचर सृष्टी निर्माण झाली .पुन्हा डार्विनचा उत्क्रांतीवाद पूर्णतः लंगडा पडतो. अंदमानात कोणा एका माणसाला ४ इंच शेपटी होती. त्यावरून वानर हेच मानवाचे वंशज अशी काही भंपक उदाहरणे देवुन मानवाचा वानराशी संबंध काही विद्वानांनी जोडला.ही सर्व निर्मिती सहेतुक का योगा योगाची? शरीराची रचना पाह ता या मागे कोणीतरी आहे हेच सिद्ध होते.! या मागे कोणीतरी आहे हे नक्की?वीर हनुमान वानर असू शकेल का?वराह या प्रथम दहा अवतारा मध्ये योगायोगाने आले असावे असे वाटत नाही. अभ्यास केल्यास त्या मध्ये निश्तीत योजना आढळून येते..!!

मानवाचा जन्मही असाच आसवा,अचानक किवां spontaneous नसावा.कारण इतर सृष्टीला जे लागू नाही ते देवाने मानवाला भरभरून दिले.मन,बुद्धी,हृदय,मेंदू शिवाय काम,क्रोध,मद,मत्सर अशासारखे षड्विका रही दिले. या पलीकडे शरीरात आत्मा नावाचा आणखी एक ठेवा त्याने ठेवला. आत्मा हाच परमात्म्याचा अंश असे मानतात.योग,ध्यान धारणा, तपश्चर्या यातुन आत्म्याला परमात्माची ओळख होते.परमेश्वरी अस्तित्वा ची जाणीव यामधुनच साधु, संन्याशी,योगी यांना झाली.

श्री राम,कृष्ण,मत्स्य,कुर्म,वराह हे पाच अवतार आपण अवलोकिले.यापुढेऊर्वरित पाच अवतारांमध्ये परशुराम,वामन,नरसिंह,बौद्ध व कल्की हे होत.या पैकी परशुरामाने २१ वेळा पृथ्वी निःक्षत्रिय केली होती असा संदर्भ आहे.एक वेळ नि:क्षत्रिय केल्यावर २० वेळा मग कोठले क्षत्रिय आले? अलीकडचेच उदाहरण क्षत्रियांच्या अस्तित्वाचे.म्हणजे भारत स्वतंत्र झाला त्यावेळी हिंदुस्तानांत ७०० संस्थाने होती.ती सर्वच भारतात विलीन झाली.या संस्थानांचे  जे प्रमुख होते ते राजे म्हणजे क्षत्रियच ना?क्षत्रियांचे शिरकाण करणारा परशुराम जमदग्नी या क्रोधी व्यक्तिमत्वाचा सुपुत्र! जमदग्नी च्या आज्ञेप्रमाणे माता रेणुकेला ठार करणारा तोही अवतारच! क्षत्रियांना संपवणारा,मातेला ठार मारणारा हा अवतार कसा? याचे कोडे उलगडत नाही!

श्री.नरसिंह अवतारमध्ये नास्तिक हिरण्यकश्यपुचा वध अर्ध मानव व अर्धासिंह  या रूपातील श्री.नरसिंहाने हिरण्यकश्यपुच्या पुत्राच्या आर्त पार्थनेनें केला.परमेश्वर सर्वत्र आहे असे म्हणणाऱ्या प्रल्हादाने "या खांबातही तो आहे" म्हणताच हिरण्यकश्यपु नावाच्या राक्षस राजाने खांबाला लाथ मारली व त्यातुन श्री.नरसिंह प्रगटले व त्यांनी कश्यपुचा वध केला. परमेश्वराचे अस्तित्व सर्वत्र असल्याचे हे उद्धरण आहे.नारायणाने दुष्टाला मारण्यासाठी नरसिंहाचा अवतार घेतला...!

वामनाचा अवतार व बळीराजाची कथा देशभर ठावुक आहे. महाराष्ट्रात शेतकरी-कष्टकरी समाजही ते जाणतो. दिवाळीत बळीप्रतिपदा पवित्र मानतात.कृषक वर्गाचा राजा म्हणून बळी ओळखला जातो.तो प्रचंड ताकदवान झाल्याने श्री.नारायणांनी त्याला बटु वामनाच्या रूपात फक्त तीन पावले जमीन मागुन संपविले. नेमकी ही कथा काय असावी याचेहि कोडे आहे. राजा दानशुर स्वप्नात दिलेले राज्य वास्तवात देणारा राजा हरीश्चंद्र किंवा

कवचकुंडले इंद्राला देणारा राजा कर्ण यांची परंपरा लाभलेला बळीराजा. तीन पावले जमीन मागणाऱ्या वामनाला चकित होऊन ती देतो.वामनाच्या पहिल्या पावलाने पृथ्वी व दुसऱ्या पावलाने स्वर्ग व्यापला जातो. बळीराजाला वामन  आता "तिसरे पाऊल कोठे ठेवु" म्हणून विचारतो त्यावर बळीराजा वाकून आपली मान पुढे करतो.अवतारी वामन त्याच्या मानेवर पाय ठेवून पाताळात ढकलतो व कायमचा संपवतो. बळीराजाची कीर्ती आजही सर्व शेतकरी घरामध्ये जीवंत आहे."ईडा पिडा टळु दे-बळीचे राज्य येऊ दे" असं ग्रामीण भागात आजही शेतकरी महिला देवाकडे मागतात.बळीराजाचे राज्य या देशात कधी आले नाही.इथुन पुढे येणारही नाही. म्हणुनच शेतकऱ्यांच्या आत्महत्या  होत आहेत. पछन्न स्वरूपात आजही अनेक वामनराव अस्तित्वात आहेत.बळीराजे बळी जाताहेत. हेच या वामन अवताराचे फलीत आहे.

महात्मा गौतम बुद्धांना हिंदुनी अवतार मानले आहे. हे ही कोडे आहे. ज्या गौतम बुद्धांच्या विचारसरणीने या देशातील हिंदुधर्म संपवला. त्यांनाच हिंदूनी आपल्या दहा अवतारात का बसवले? गौतम बुद्धांच्या बौद्ध विचारसरणीला सम्राट अशोकाचा राजाश्राय मिळाला व अशोकाने या धर्माचा प्रसार देशभर करून आपल्या संघमित्रा व महिंद्र या मुलांकडून परदेशात पोहचवला. चीन, जपान, थायलंड, मलेशिया, ब्रम्हदेश, कोरिया  इत्यादी देशात हा धर्म पोहचला. आज जगात सर्वात जास्त संख्या बौद्धांची आहे. हिंदुस्तानात हिंदुधर्म संपुष्टात आला. आद्य श्री. शंकराचार्यानी मोठ्या कष्टानें व बुद्धीचातुर्याने देशभर भ्रमण करून,धर्म सभा भरवुन चार दिशांना धर्मपीठे स्थापन करून हिंदू धर्माचे पुनरुज्जीवन केले. येथली जनता हिंदुधर्मातील कर्मकांडाला कंटाळली होती.परदेश गमन निषिध्द, पुजा पाठाला महत्व, पाप-पुण्याच्या भ्रामक कल्पना, ज

ज्ञान देणे हा अधिकार फक्त एकाच वर्गाचा अशा अनेक गोष्टीनी जनता पिडली होती. उच्च-नीच वर्ग ठरवले गेले होते.जातीची उतरंड तयार झाली.सर्वत्र वर्गव्यवस्था तयार झाली. त्यामुळे बौद्धधर्म सहजपणे येते रुजला, वाढला, बाहेर गेला. अहिंसा, सत्य , सहिष्णुता या तत्वावर आधारित बौद्ध धर्माची उभारणी झाली. परंतु यातल्या अहिंसेच्या तत्वाने येथल्या क्षात्रधर्माचा लोप झाला. तलवारी म्यान झाल्या.हत्यारे खाली ठेवली गेली. त्यामुळेच शक,हुण,कुशाण यांच्या टोळ्या प्रचंड ताकदीनिशी खैबर,बोलन खिंडीतुन येथे घुसल्या.येथल्या अनेक राजांचा पराभव करून त्या येथेच स्थिरावल्या. सांस्कृतिक देवाण-घेवाण सुरु झाली. येथल्या आर्य,द्रविड, संस्कृतीशी त्यांचा मिलाफ झाला.सिकंदराची स्वारी झाली. पराभवच,पराभव ..! सेल्यकस निकेटर आला. इराक,इराण,अफघाण येथ ल्या स्वाऱ्या सुरु झाल्या. मोगल स्वारी बाबरापासुन झाली. बाबर, हुमा युन, अकबर, जहांगीर, शहाजहान, औरंगजेब असे देशातले सर्व शक्ति मान सम्राट येथे होऊन गेले.बारा आणे भारत त्याच्या अधिप्त्याखाली होता. औरंगजेब बादशहाकडे दहा लाख खडे सैन्य होते. तुघलक घराणे, लोदी घराणे,घोरी घराणे, कुतुबुद्धीन ऐबक, अल्लाउदीन खिलजी अहमद शहा अब्दाली- ज्याने पानिपतात एक लाख सैन्य मारले - अशा अनेक सुलतानानी बादशाहानी दिल्लीतून देशावर राज्य केले. याचे कारण क्षात्रतेज संपुष्टात आले हेच होय.अहिंसा तत्व नक्कीच आदरणीय आहे. पण नंग्या तलवारी भोवती नाचताना नव्हे ! पृथ्वीवरचा शेवटचा अवतार जन्माला अप्रत्यक्षरीत्या अनेक रूपानी आलेलाच आहे . कल्की हे त्याचे नाव.त्यावरून या युगाला कलीयुग असे म्हटले जाते. सत्य,द्वापार,त्रेता व कली अशी ही चार युगे. तीन सरली. शेवटचे कलीयुग. कल्की नावाचा

अवतारी पुरुष विश्वनाश करणार आहे असे येथे मानले जाते. ब्रम्हा-विष्णू-महेश या देवतांचे कार्य अनुक्रमे निर्मिती, स्थिती व लय असे आहे. शंकरांना सर्वनाश करणारे-destroyer-असे मानले जाते.शंकरांच्या या कार्यासच कल्की अवताराचे कार्य असे मानले जाते. पृथ्वीवर आज सर्वत्र हैदोस सुरु आहे. मानवाच्याच अंगात कल्की अवतरला आहे. त्याने एकमेकाच्या नाशासाठी अणू, हैड्रोजन, क्लोरीन,रासायनिक बॉब तयार केले आहेत. दोन बॉबमध्ये जपानची हिरोशिमा व नागासकी ही मोठी शहरे भस्मसात झाली. असे बॉब असणारी किमान १५ राष्ट्रे पृथ्वीवर आहेत. एका देशाने बॉब उडवला कि जागतिक युद्धाचा भडका उडून सर्व भस्मसात होणार आहे. क्युबावरून ६० च्या दशकात व कोरियाच्या किम जोंगच्या चीथावणीखोर वागण्यातून असे युद्ध आज सुद्धा होऊ शकते आणि त्यातून विध्वंस ठरलेला ! मानव आपल्या हातानेच आपला विनाश करून घेत आहे. जगातील अब्जावधी वाहने कार्बन डाय ऑक्साईड सोडत आहेत. उद्योगधंदे,प्रदूषित हवा, पाणी सोडत आहेत. प्लास्टिकचा अतिवापर सुरु आहे.कॉक्रीट जंगले,जंगलतोड,विषारी किटक नाशके, पिकरोगावरील औषधे, रोज जगभर होत असलेले डांबरीकरणाचे, सिमेंटीगचे हजारो किलो मिटरचे रस्ते,अशी अनेक कारणे मानवाने विनाशाकरिता तयार करून ठेवली आहेत.याचा निर्माता माणूसच आहे. आज सार्वत्रिक सरासरी ४० डिग्री सेल्सियस तापमान आहे. ते काही भूभागात ४८-५० डिग्रीपर्यंत आहे. आजच वाढत्या तापमानाने अंटार्कटिकातील बर्फ वितळून समुद्राच्या पाण्याची पातळी वाढताना आपण पाहत आहोत. पृथ्वीवरचे मोठ्या भूभागावारचे तापमान २० वर्षात ८ डिग्री सेल्सियसने वाढेल असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. त्यानंतर होणारा हाहाकार प्रचंड

असेल. भूकंप सुनामी,लाटा,वादळे होतील. प्रचंड पाऊस पडेल. समुद्राच्या वाढ पातळीत वाढ होऊन अनेक देश बुडून जातील. काय काय होईल याचा अंदाज न केलेला बरा! एवढे मात्र खरे कि पृथ्वीचा विनाश अटळ असेल. हाच तर कल्की अवताराचा मतीतार्थ आहे श्री शंकराच्या सर्व विनाशाच्या कार्याबद्दलचे मानवी ज्ञान खरे ठरणार आहे. स्वतःच्या हातानेच मानव हा विनाश आज ओढवून घेताना आढळतो. पृथ्वीवरील प्रदुषणामध्ये कोण मागे आहे ? प्रत्येकजण किटकननाशके, प्लास्टीक, कॉंक्रीटिंग, जंगलतोडी,वाहने अशामधून कल्कीच्या अवतारकार्याला हातभार लावतो आहे.उदया होणाऱ्या पृथ्वीच्या विनाशाला कल्कीच कशाला हवा? आम्हीच आमच्या विनाशाचे शिल्पकार असणार आहोत..! काल्कीराजा तुला त्रास होणार नाही असे प्रामाणिक कार्य आम्ही करून दाखवू. त्यामुळे आमच्या डोळ्यांना तू दिसणारही नाहीस असे वागून सर्वनाश ओढावून घेऊ! तू येथे अवतरण्यापूर्वीच आम्ही सर्व पृथ्वीवासीय तुझे अवतार कार्य पुरे करून दाखवू ! त्यामुळे पृथ्वीवासीय म्हणतील दशावतार नव्हे तर नऊ अवतारच येथे अवतरले ! पण हे म्हणावयाला तरी कोण येथे असणार आहे?सर्वत्र विध्वंस - विध्वंस आणि विध्वंसच ! काल्कीराजा तुला पृथ्वीवर यावयाची संधी आम्ही देणार नाही.आम्ही सक्षम आहोत..!

# The King of Freedom: Kalki

Raviraj Kupekar

World and Universe shall see a new day,
Kalki and his thoughts will show you a new way,
Kingdom of good and new,
Freedom to every he will give….|1|

Born in a family of happy and poor,
As a kid playing door to door,
Friends he made with care and good hands,
Freedom will be on every lands..|2|

Went he to a school,
Treated was he and every made him fool,
Studied good and made a new mark,
Leading to a new life and ark…|3|




Struggle in every bit of life,
Followed his way of path,
Trusted his soul and new way to lead,
Care and love is what everyone's need..|4|

During his studies friends were nice and good,
Finding a new way to water and food,
Good in studies he was,
Never end your life with a pause….|5|

One day he found were he is,
Fighting for life from head to knees,
He was harmed by one,
Was his aim to kill and just for fun….|6|

Kalki understood the persons aim,
He shall now show his own game,
We shall trust own soul,
Life shall show you every goal…..|7|

He works for new world,
World of humanity and humans,
Caring and loving every single bit,
Every animal and plant,
Every water and land….|8|

He works for good family,
Family of peace and smile every,
Fight not for money,
Saying you shall leave here every honey…|9|

Making a new world of human's,
Not with cast or color,
People joined together like a rainbow,
Everyone with unique work and thoughts…..|10|

We shall be together,
Just keep away every bad and gun,
Wars shall turn and everything will burn,
We shall be one…..|11|

Feel the heart and soul,
What it says,
Peace and harmony in coming days,
Thoughts what Kalki plays……|12|

Trust and believe the 10 Avatar,
Gods and Gurus made a master piece,
Kalki will bring love and peace,
Trust is what he wants on him…..|13|

Trust your body and God,
Toxic and drugs is not good work,
They kill you and you are none,
Don't do it just for fun…|14|

He shall solve every problem,
With sword if need,
World shall sow new seed,
Humble Life is what you read …|15|

He shall bring new way,
Thing and believe him,
Thoughts of happy and new day,
Trust and Care him…..|16|

One day shall come,
Truth and happy is everyone,
No Politics and bad against any,
Care to all and many………..|17|

Kalki thoughts to thinks,
Can the human sorted,
With work they be hearted,
Work shall be their name..|18|

Name they shall from work,
Nothing shall be small or big,
Same sort any in car or one who dig,
People of work we shall find…..|19|

Work shall be defined as,
Sectors that shall turn them the surname,
The work be the identity,
Today and tomorrow be the humanity….|20|

Happy with my thoughts every in future,
True be every person and culture,
Let the sun rise,
World with Kalki have freedom and be wise…….|21|

# मानवी शरीरातील साखरेचा प्रवास

डॉ. अमोल बापूराव जाधव MD ( ayu) BHU ,माधवबाग,शाखा - गडहिंग्लज

हल्ली अनेक औषधी कंपन्या मधुमेह बरा करून देण्याचा दावा करीत आहेत,वेगवेगळ्या प्रकारची चूर्णे काही वनस्पतींचे अर्क तर कधी शुगर विरोधी च्यवनप्राश असे एक ना अनेक प्रकार बाजारात उपलब्ध आहेत.

पण खरेच असे एखादे औषध खाऊन आपण आपला मधुमेह बरा करून घेऊ शकतो का ? मुळात मधुमेहासारखा चिकट आजार मुळापासून नष्ट करणे शक्य आहे का ? या आणि अशाच काही प्रश्नांची उत्तरे आपण या लेखात शोधण्याचा प्रयत्न करणार आहोत.



चला तर मग, मित्रांनो आपल्या शरीरांमध्ये हि गोड गोड साखर कशी हळुवारपणे शिरते कशी आपलाच प्राण वेठीस धरते हे पाहूया !

सुरवातीस प्रत्येक साखरेचा रुग्ण अपघातानेच किंवा औत्सुकतेपोटी रक्तातील साखर तपासून घेतल्याने सुदैवाने म्हणा किंवा दुर्दैवाने डॉक्टर समोर मधुमेहाचा रिपोर्ट घेऊन उभा असतो. पण त्याला त्या डॉक्टरचे निदान अजिबात पटलेले नसते. आणि त्या वेळेपासूनच त्याचा आणि त्याच्या शरीरात साठत चाललेल्या साखरेचा एकमेकांसोबत लपंडावाचा खेळ सुरु होतो.

सुरुवातीस रुग्ण अनेक लॅब्स बदलून रिपोर्टस् काढून बघतो. कधी साखरेची लेवल कमी (नॉर्मल)आली तर त्याला वाटते कि मागची लॅब चुकीची होती आणि कधी साखरेची लेवल जास्त दिसली तर तो लगेच म्हणतो बहुतेक हे मशीन चुकीचे आहे.

हळूहळू त्याचा हा शीत युध्दयुक्त लपंडाव उग्र  व्ददयुद्धात परिवर्तित होऊ लागतो. एव्हाना सर्व लॅबचे रिपोर्ट आता सारखे येऊ लागलेले असतात आणि अर्थातच त्याने अनेक डॉक्टर्सपण बदललेले असतात. अजूनही मनात किंतु परंतु बाळगून हा बिचारा कधी कारल्याचा ज्यूस पितो तर कधी जांभूळ बी पावडर युनानी पासून एलोपैथी पर्यंत याची दरमजल सुरु होते आणि मग नाइलाजाने एक छोटीशी गोळी अगदी नित्यनेमाने सुरु होते त्या सोबत महिन्याला उपाशीपोटी जेवणानंतर साखर तपासून मधुमेह तज्ञांची पायरी झिजवणे सुध्दा सुरु होते.

हळूहळू काळ निघून चाललेला असतो अनेक केसेसमध्ये एकाच्या दोन दोनांच्या तीन क्वचित पाच गोळ्या सुरु होतात आणि एवढयाने शुगर आवरत नाही म्हणून मग इन्सुलिन  नावाचे ब्रह्मास्त्र या युद्धात चमकायला लागते. आता हा थकलेला भागलेला हतबल झालेला रुग्ण आपल्याच शरीरातील साखरेशी झगडत जीवन कंठत असतो.कधी काळी जीव कि प्राण असलेली साखर त्याची पक्की वैरीन झालेली असते. इन्सुलिन नावाचे ब्रह्मास्त्र आता त्याला ब्रह्मास्त्र न वाटता शरपिंजरा प्रमाणे भासत असते. रोजचे अन्न खाताना त्याला यमसदनी गेलेले बरे असे वैफल्य आलेले असते.

पण... एक मिनिट थांबा... आपण परत एकदा फ्लॅश बॅकमध्ये जाऊन विचार करूया... आपल्याला मधुमेह हे लक्षण कसे निर्माण होते हे जाणून घेण्यासाठी आपल्याला आपल्या शरीरातील आपल्या प्राणप्रियेचा (साखरेचा) प्रवास कसा होतो. हे जाणून घेणे अत्यंत गरजेचे आहे. मित्रांनो, सर्व प्राणीमात्रांस जीवन जगण्यास तसेच रोजच्या अगणित क्रिया करण्यात उर्जेची गरज असते. त्याच प्रमाणे मानवी शरीरसुध्दा साखर, चरबी आणि प्रथिने या तीन प्रकारच्या अन्न पदार्थांपासूनच

ऊर्जा निर्मिती करत असते.

सामान्यतः आपल्याकडे आपल्या जन्मापासूनच आपण साखरयुक्त ऊर्जेचाच वापर मुबलक प्रमाणात करत आलो आहोत. तरुणवयामध्ये ही साखर आपल्या अतिरिक्त हालचाली आणि कष्टांमुळे पुरेपूर प्रमाणात वापरली जात असते. पण जस - जसे आपले वय वाढत असते. तस - तसे आपल्या हालचाली आणि कष्ट करण्याची प्रवृत्ती कमी - कमी होत जाते. अशा वेळी आपली साखर पचवण्याची जी यंत्रणा आहे ती सुध्दा आळसुन गेलेली असते.

या काळात जर अशा व्यक्तीने प्रत्यक्ष साखर किंवा साखरयुक्त पदार्थ किंवा पटकन साखरेचा साखरेत अतिरिक्त साठा शरीरात तयार होऊ लागतो. या साखरेचे रक्तामधून पेशींपर्यंत आणि यकृता पर्यंत प्राकृतिक रित्या वहन करणारे जे नैसर्गिक इन्सुलिन सुध्दा या अतिरिक्त साखरेला चरबीमध्ये रुपांतरीत करू लागते. सुरुवातीचे काही दिवस अत्यंत प्रामाणिक पणे साखरेचे वहन करणारे हे इन्सुलिन दुष्ट चक्राम ध्ये अडकू लागते.

अतिरिक्त साखरेचे रुपांतर चरबीमध्ये करून ही चरबी प्रथमतः उदरावर, नितंबावर, आतड्यांवर, यकृतामध्ये आणि रक्तवाहिन्यांच्या अंत:स्तरावर लेप केल्याप्रमाणे ही चरबी साठवण्याचे काम आपले भोळे भाबडे इन्सुलिन करते. पण त्याला हे कळत नाही की जर अशा प्रकारे चरबीचे लेप किंवा आवरणे त्याने पेशींवरती चढवली तर कालांतराने तो स्वत: त्या पेशीपर्यंत पोचू शकणार नाही आणि पर्यायाने शरीरात किंवा रक्तात फिरणाऱ्या साखरेला ऊर्जास्रोत म्हणून त्या पेशीपर्यंत पोचवू शकणार नाही. पण त्याला जर येवढे कळाले असते. तर त्यांने अतिरिक्त साखरेची अनावश्यक चरबी बनवलीच नसती.

आतल्या आत साखरेची आणि इन्सुलिनची ही गणिते सुरु असताना माणूस मात्र आपली जीवनशैली बदलण्यास तयार नसतो. न तो साखर खाणे कमी करतो, न तो साठलेली साखर वापरणे सुरु करतो. अजून एक गंमत म्हणजे मानवी शरीरात आणखी एक यंत्रणा साखरेचे प्रमाण वाढवत असते. ती म्हणजे ताणतणाव, जो कोणालाही या कलियुगात टळलेला नाही. ज्या वेळी साखरेचा पुरवठा गरजेपेक्षा जास्त होऊ लागतो आणि इन्सुलिन महाराज सुध्दा साखरेचे गणित सोडवायला असमर्थ ठरतात. त्यावेळी इन्सुलिन आणि साखर दोघेही शरीरात उपलब्ध असून पेशींना वापरता येत नाही.

मग काही प्रमाणात ही साखर यकृतात साठवली जाते आणि यकृताचीही क्षमता भरल्यानंतर पुन्हा जैसे थे, तशीच ती साखर पुन्हा रक्तात आणून सोडली जाते. एव्हाना साखर पचण्याचे सर्व मार्ग बंद झालेले असतात. जादा झालेली साखर आता लघवी वाटे बाहेर येत असते. रक्तात आणि लघवीत वाढलेल्या साखरेच्या प्रमाणालाच आपण मधुमेह हे लक्षण म्हणतो.

**पण विचार करा मधुमेही मित्रांनो**

- **जर आपण आपल्या यकृतातील साखरेचा साठा शरीरास वापरण्यास भाग पाडून नष्ट केला.**
- **प्रत्येक पेशीवरील चरबीचे आवरण नष्ट करण्यास शरीरास मदत केली.**
- **शरीराच्या कार्यकारी शक्तीस अनुसरून सारासार विचाराने आहारामध्ये योग्य परिवर्तन केले.**

तर पुन्हा एकदा आपल्या शरीरात इन्शुलीन आणि साखर गुण्यागोविंदाने नांदू लागेल. यात तीळ मात्र शंका नाही. मित्रांनो अनेक संशोधने

आणि प्रयोगानंतर माधवबाग ही संस्था रक्तातील साखरेवर कायमस्वरूपी नियंत्रण मिळवण्यात यशस्वी झाली आहे. या चिकित्सेत प्रामुख्याने आहार, व्यायाम, औषधे आणि आयुर्वेदिक पंचकर्म या चतु:सूत्रांचा वापर केला जातो. चला तर मग पुन्हा एकदा आपल्या उर्वरित आयुष्याचा प्रत्येक दिवस गोड करूया.

आपले वैफल्य सोडून मधुमेहावर खऱ्या
अर्थाने मात करूया ...

**मधुमेह हरेल महाराष्ट्र जिंकेल....**

105 वर्षाची दिवाळी अंक परंपरा ही खास मराठी अभिरूचीचे प्रतीक आहे.

# आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक संघटना

## International Diwali Ank Association

### विशेष आंतरराष्ट्रीय विनाशुल्क खुली मराठी दिवाळी अंक स्पर्धा 2013

## सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक पुरस्कार

# ज्ञानमुद्रा

या दिवाळी अंकास सन्मानपुर्वक बहाल करण्यात येत आहे.मराठी संस्कृतीला भरभरून देणा-या दिवाळी अंकांबददल कृतज्ञता व्यक्त करण्याकरिता व दिवाळी अंकांच्या वैश्विक पातळीवरील संवर्धनासाठी या पुढील काळातही आपण प्रयत्न कराल ही अपेक्षा आणि त्यासाठी हार्दिक शुभेच्छा!

| अनिल धुदाट | राज धुदाट | डॉ.सुनील पाटील |
|---|---|---|
| संचालक | मुख्य कार्यकारी संचालक | कार्यकारी संचालक |

संपर्क: 02322-225500, 9975873569, sunildadapatil@gmail.com, sunil77p@rediffmail.com




DREAMS
TATTOO STUDIO
आकर्षक ऑफर उपलब्ध
अनुभवी आर्टिस्ट
पर्मनंट व टेंपररी टॅटू
टॅटू मार्गदर्शन आणि माहिती
श्री काडसिद्धेश्वर रेसिडेन्सी , भाजी मार्केट समोर , भडगांव रोड , गडहिंग्लज .
ड्रिम वर्ल्ड टुर्स अँड रियल इस्टेट
हॉटेल बूकींग
टुर्स पॅकेज बूकींग
रेल्वे तिकीट बूकींग
बस तिकीट बूकींग
विमान तिकीट बूकींग
जहाज तिकीट बूकींग
फॉरेन मनी एक्सचेंज
कार रेंटल
पासपोर्ट
व्हिजा
मनी ट्रान्सफर
संपर्क - 9075002026 , 9970582026 , 9075022026 , 9970581939 .
श्री काडसिद्धेश्वर रेसिडेन्सी , भाजी मार्केट समोर , भडगांव रोड , गडहिंग्लज .


हॉटेल अनिकेत
व मंगल कार्यालय , महागांव
संपर्क
9821188232 , 9763381251
★ व्हेज , नॉनव्हेज जेवणाची लज्जत
★ AC , NON AC ROOMS राहण्याची उत्तम सोय
★ लग्नसमारंभ , साखरपुडा , कॉन्फरन्स , फॅमिली पार्टी इतयादीची खास सोय
★ निसर्गरम्य वातावरण , फॅमिलीसाठी स्वतंत्र व्यवस्था
★ 1000 लोकांची एकाचवेळी जेवणाची बैठक व्यवस्था
★ उडपी मॅनेजमेंट , तत्पर व विनम्र सेवा

# पत्राच उत्तर मिळालंच नाही

ॲड. दिग्विजय वि. कुराडे
सरपंच ग्रामपंचायत, ऐनापूर,मो. ९२२६७२८८०८

आमदार बाबासाहेब कुपेकरांच्या दु:खद निधनाची बातमी धक्का देणारीच होती. येण केण प्रकारे कोणत्या ना कोणत्या कारणासाठी गडहिंग्लज तालुक्यातील बहुतांश व्यक्ती, सामाजिक, राजकीय संघटना यांच्याशी बाबांचा थेट संबंध आलेल्या अनेक लोकांना धक्का बसला. त्यापैकी मी एक प्रत्येकाच्या गाठोडीत बाबासाहेबांच्या कित्येक आठवणी. माझ्याकडच्या आठवणी मोजक्याच पण मोलाच्या एक आठवण उघड करावीच लागेल. ती म्हणजे त्यांच्या पत्रव्यवहाराची.



अत्यंत धकाधकीच्या व संवेदनाहीन अशा दुर्दैवाने समजत गेलेल्या राजकीय कार्यकिर्दीत सुध्दा पाठ विलेल्या एका पत्राला उत्तर देण्याची संवेदनशील ता जपणाऱ्या फार कमी राजकीय लोकांच्यापैकी बाबासाहेब एक. दुर्दैवाने मला फार काही त्यांचा सहवास लाभला नाही.

२००९ -१० च्या विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचाराच्या निमित्ताने मुत्नाळ गावातील माझे भाषण ऐकूण मला त्यांनी आपल्या गाडीत बसून घेतले. पुढील चार दिवस त्यांनी स्वत: हून मला अनेक गावात भाषण करण्यास सांगितले. प्रत्येक वेळेस भाषणात काय सुधारणा झाली पाहिजे याचे मार्गदर्शन त्यांनी मला केले. त्या चारच दिवसात निर्माण झालेलं नातं, तिथून पुढच्या प्रत्येक भेटीत आणखी घट्ट कसं होईल याची दक्षता त्यांनी स्वत:हून घेतली. कोल्हापूर येथील घरी एकदा सहजच भेटायला गेलो आहे, असं समजल्यावर अत्यंत

धावपळीत असताना सुध्दा दहा मिनिटे साहेबांनी माझ्यासाठी काढली. " राजकारणच करायचं असेल तर ग्राम-पंचायत, सोसायटी, डेअरी पासूनच सुरवात करा. तरच यशस्वी होशील!" हा मोलाचा मार्गदर्शन सल्ला साहेबांनी मला त्यावेळी दिला. प्रत्येक भेटीत पुस्तकांचा विषय नित्याचाच. "वाड्यावर या पुस्तक वाचायला देतो" हे वाक्यही ठरलेलंच. पण, माझ्या दुर्दैवाने माझ्याकडून वाड्यावर जाऊन पुस्तक घ्यायचं राहूनच गेल.

राजकारण व वाचनाच्या प्रचंड आवडीबरोबरच पत्रव्यवहार हि सुध्दा साहेबांची खासियत. वाढदिनाच्या अभिष्टचिंतनाचे पत्र पाठविले तर त्यांनाही उत्तर आलं. सोबत माझ्या प्रगतीची व आई - वडिलांच्या तब्येतीची विचारणाही होतीच. पण, मी त्यांना पाठविलेल्या शेवटच्या पत्राचे उत्तर मात्र आले नाही, याची आयुष्यभर मला रुखरुख राहिल. काही महिन्यापूर्वी कुठल्याशा दैनिकामध्ये ' वाचनाची आवड जपणारा नेता' अशी बातमी प्रसिध्द झाली होती. त्या बातमीचा आधार घेऊन बाबासाहेबांना मी माझ्या वडिलांना लिहिलेली 'झपाटलेले झाड' ही कादंबरी व त्या सोबत एक 'पत्र' पोष्टाने पाठविलं. त्या पत्रात मी साहेबांना" तुमचं आत्मचरित्र पुस्तकरुपी वाचायला आवडेल." असे लिहिलं होतं. त्यानंतरच्या भेटीत रेस्ट हाउसमध्ये गर्दीतून त्यांनी मला हाक मारून बोलावून घेतलं व पुस्तक एकाच रात्रीत वाचलं म्हणून सांगितलं. त्याचबरोबर "तुझ्या पत्राचं उत्तर काय द्यावं याचा विचार मी करतोय व लवकरच तुला पत्र पाठवितो." असं सांगायला देखील बाबासाहेब विसरले नाहीत.पण, दुर्दैवाने माझ्या 'त्या' भावनिक दृष्ट्या जोडल्या गेलेल्या पत्राचे उत्तर मला मिळायचे राहूनच गेले व आत्ता कधीच मिळणारही नाही हि, खंत आयुष्यभर राहील..साहेबांना श्रद्धांजली.

# सुसंगत

सौ. मधुमती उदय शिंदे
२२४ ई वॉ्डर शिंदे बंगला
ताराबाई पा्कर कोल्हापूर
मोबाईल – ९४०४२६३२६३

काही विषयीचं आकर्षण आपल्याला लहानपणापासून असतं. कर्ण हा सतत आपले दुर्वोधनासाठी जीवन अर्पण करत असतो. तो सुतपुत्र म्हणून त्यांची उपेक्षा लहानपणापासून त्याचे सवंगडी करत असतात व तो अवमानित आयुष्य जगत असतो. तरीही तो परिस्थितीशी मात करत आपलं आयुष्य सार्थक करतो. जीवनात साऱ्या इच्छा आकांक्षा यांची स्वप्ने उराशी बाळगून आपण सुबक देव्हारे मनात तयार करतो. पण त्या इच्छा आकांक्षा साकार होतात. तेव्हा त्यांनी वेगळाच आकार धारण केलेला असतो. पण मनात असंख्य स्वप्ने जीवनाची  रंगवलेली अपुरी ठरतात. तेव्हा जिद्द न हरता. उगवल्या सूर्याच्या किरणांप्रमाणे परत जोमाने उठून सत्कर्म व आपले ध्येय साध्य करणे.

आपल्या सर्वाना माहित आहे कौरव - पांडवांचे युध्द कित्येक दिवस चालले दुर्योधनाची नितीमत्ता व स्वार्थीपणा माहित असूनही कर्णाने कधीच दुर्योधनाची साथ सोडली नाही. त्याने मित्राला दिलेले वचन अखेरपर्यंत पाळले. कुंतीही आपली माता आहे हे नाते कळल्यापासून तो अस्वस्थ होता. कुंतीला त्याने युध्दकाळी वचन दिलं. “ मी फक्त अर्जुनाशीच लढेन त्यामुळे तुझी पाचही पुत्र तरीही सुखरूप राहतील.” इंद्र याचक म्हणून येणार हे सूर्याने सांगूनही तो आपली कवच कुंडली दान देतो. मित्रासाठी जीवन अर्पण करणारा.आईच्या आज्ञेखातर आपलं आयुष्य युध्दभूमीवर समर्पित करतो. असा पुत्र कुंतीला असूनही ती आपल्या पाच पांडवांसाठी त्याचं जीवन दान करते.

दानशूरपणा हा त्याचा स्थायीभाव होता. कोणताही याचक मोकळ्या हाताने जाऊ नये याची तो सदैव दक्षता होतो. दिलेला शब्द पाळणे हे कर्णाचे वैशिष्ट्य. जन्मापासून मृत्यूपर्यंत दुर्दैवाने सतत त्याचा पाठलाग केला होता. त्याला कुणाचीही साथ नसताना तो परिस्थितीशी एकटाच झगडत आपलं आयुष्य प्रज्वलित करून अमर झाला. ना त्याला द्रोणा चार्यासारखा गुरु, राजपुत्र असूनही ऐश्वर्यसंपन्न राज्य नाही व ज्येष्ठ कुंतीपुत्र असूनही सतत हीनवाणी वागणूक मिळत गेली. सतत आयुष्यात अवमानी होऊनही त्याने कधीही वैतागून आयुष्यात शेवट केला नाही. हवं ते हरवणं आयुष्यात हे दैवी सदैव असतं तरीही आपण सतत प्रयत्न चिकाटी व ध्येय ठेऊन न डगमगता कष्ट करत राहिलं कि यश चालून येतं हे आपण या थोर मनुष्याकडून शिकलं पहिजे.

आपल्या जीवनात अशी अनेक संकटे येत राहतात. परमेश्वराने आपल्याला सुदृढ व सुंदर जीवन दिलं आहे तेव्हा आपले मित्र व सवंगडी पारखून करावेत. तरुण पिढीला अनेक प्रलोभने. आजूबाजूला पसरलेले आहेत व ते लोहचुंबका सारखे ओढायचा अतोनात प्रयत्न करतील त्या मोहजालापासून आपलं आयुष्य जपा. मित्र करताना त्याचा अभिमान वाटावा व आपल्या आईवडिलांनी कष्टाने आपल्याला मोठं केलेलं आहे तेव्हा आपण वाईट मार्गाला जाणार नाही व आपलं मोलाचं आयुष्य बरबाद करणार नाही याची काळजी घेतली पहिजे.

कर्ण शूरवीर ज्ञानी, दानवीर व मैत्रीला जपणारा असा होता. तरीपण त्याची कुसंगत दुर्योधन यामुळे तो आयुष्यात कधीही सुखी झाला नाही व मित्रांचे फाजील लाड पुरविण्यातच त्याचं आयुष्य गेलं व त्याने सतत अधर्माचीच साय धरली. यातून आपण एवढंच शिकतो

की व्यभिचारी व अतिश्रीमंत आपल्या परिस्थितीपेक्षा असलेल्या मित्राशी चार हात लांबच राहावे. कर्णाच्या जीवनाची शोकांतीका कशामुळे झाली? व नियतीचा त्यात हात किती? हे आपण समजून घेतलं पहिजे.

सध्या हे कॉम्प्यूटर, इंटरनेट व मोबईल युग आहे आपण या इलेक्ट्रोनिक् वस्तुंबरोबर हातात हात घालून वाटचाल करत आहोत. आजकालच्या पिठीला याच्या शिवाय पर्याय नाही. जीवनाची संस्कृती या व्यापामुळे झपाट्याने बदलली आहे. एकत्र कुटुंबशैली लुप्त होत चालली आहे. तेव्हा घर हे घरपण, जिव्हाळ्याचं राहिलं नाही. प्रत्येकाच्या हातात मोबाईल तर आहेच आहे. त्यामुळे घरातल्या लोकांशी संवाद खूप कमी झाला आहे. एकमेकांची सुख - दुख पण समजून घ्यायला तरुण पिढीला वेळ नाही. घरात आईवडिलांशी प्रेमाने संवाद साधण्यापेक्षा मोबाईलव्दारे तासनतास दूर व्यक्तीशी बोलण्यात व मेसेज पाठवण्यात ते कृतज्ञता मानतात. याचा उपयोग गरज असेल तेवढाच करा. आपलं जीवन उज्वळ चांगल्या मित्रांच्या संगतीत घालवा व जेवढ जमेल तेवढं समजातून चांगलंच आत्मसात करा.

तुम्ही जेव्हा प्रगती कराल तेव्हा तुमच्याशी सरव्य जोडायला अनेक मित्र जवळ येतील. त्यातील काही जण कुमार्गाला तुम्हाला न्यायचा प्रयत्न करतील. तेव्हा तुमची बुद्धी शाबूत ठेऊन आपण सत्याचा मार्ग धरा व जीवन उज्ज्वल करा. तुम्ही एक देशाचे जागरूक नागरिक आहात तुमच्या हातात देशाचं उज्ज्वल भविष्य आहे.

# व्यसनमुक्ती केंद्राचे अग्रणी - जीवन ज्योती

अमर देसाई मोबाईल नं:9765826433

डॉक्टर म्हणजे परमेश्वराचा अवतार म्हणतात . कारण परमेश्वरानंतर माणसाला वाचवायची ताकद फक्त डॉक्टरकडेच असते. वैद्यकीय सेवा हि सर्वश्रेष्ठ समजली जाते . याच सेवेचा वारसा गेली पंधरा वर्षे डॉ. शशीकांत जाधव आणि त्यांच्या पत्नी डॉ . सौ. संजीवनी जाधव , महागाव या गावी चालवत आहेत. रुग्णांविषयी असणारी त्यांची आत्मीयता त्यांच्या प्रत्येक कृतीतून दिसून येते . आपल्याकडे येणारा प्रत्येक रुग्ण बरा झालाच पाहिजे या तळमळीने त्यांच्यावर उपचार केले जातात .कदाचित यामुळेच रुग्णांना त्यांच्या दवाखान्यात पाय टाकल्याबरोबर बर वाटायला लागत कोणत्याही आजारचे अचूक निदान आणि योग्य उपचार हि खासियत डॉ.जाधव यांची आहे .



आज समाज्यामध्ये तरुण मुलांच्यामध्ये वाढत असलेली व्यसनाधीनता कमी करण्यासाठी डॉ .जाधव यांनी २००८ साली व्यसन मुक्ती केंद्राची स्थापना केली . व्यसनाधीन व्यक्तीवर उपचार आणि त्याचं समुपदेशक या माध्यमातून व्यसनी व्यक्तीला संपूर्णपणे व्यसन मुक्त केल जात.कोल्हापूर जिल्ह्यातील हे सर्वात पाहिलं व्यसनमुक्ती केंद्र असून आजपर्यंत जवळपास ४००० पेक्षा जास्त लोकांना व्यसन मुक्ती बनवण्यात यश आल आहे . यामुळेच गडहिंग्लज परीसारतील रुग्णांसोबत आजरा , चंदगड , निपाणी , कागल , संकेश्वर ते अगदी गोवा ,बेळगाव ,औरंगाबाद इथून सुद्धा लोकं उपचारासाठी येतात.

डॉ जाधव यांच्याकडे व्यसनमुक्ती सोबतच सांधेदुखी ,मधुमेह ,अस्थमा मुळव्याध ,वजन कमी करणे , अपचनाचे विकार इत्यादी आजारावरती सुद्धा खूप चांगले आणि खात्रीशीर उपचार केले जातात.

रुग्णाला काय झालं आहे आणि त्यांच्यावर काय उपाय केले जाणार आहेत याची माहिती डॉ .जाधव रुग्णाला व त्यांच्या नातेवाईकांना देतात. त्यामुळे रुग्ण आणि रुग्णांचे नातेवाईक निश्चिंत राहतात . कारण डॉ .जाधव आपल्याला बरे करणार हा विश्वास त्यांच्यात निर्माण होतो. कोणतेही हॉस्पिटल अथवा दवाखान्याचा महत्त्वाचा भाग असतो तो म्हणजे सपोर्ट स्टाफ . डॉ . जाधवांनी ही बाब खूप चांगल्या पद्धतींनी सांभाळली आहे . अतिशय ट्रेन स्टाफ त्यांच्याकडे आहे .येणाऱ्या पेशंटशी अदबीने बोलणे आणि त्याची योग्य ती काळजी घेणे या गोष्टी दवाखाण्यात आवर्जून संभाळल्या जातात .

आजच्या समाजाला व्यसनमुक्ती केंद्राची निकडीची गरज आहे . तरुण पिढी व्यसनाच्या आहारी जात आहे . व्यसनी व्यक्ती सहजा सहजी व्यसनमुक्ती केंद्राशी संपर्क करत नाहीत तर त्यांच्या कुटुंबातील महिला व इतर नातेवाईक संपर्क करतात . व्यसनी व्यक्तीवरील उपचार त्या व्यक्तीला न समजता सुद्धा करता येतात . महिलांनी या कमी पुढाकार घ्यावा जेणेकरून व्यसन मुक्ती चळवळ यशस्वी होईल यात काही शंका नाही .यामुळेच वेदनेने तळमळणारा रुग्ण जेव्हा दवाखान्यात येतो आणि योग्य उपचारांनी बरे होऊन हसतमुखाने दवाखान्याबाहेर पडतो .तेव्हा या डॉक्टर रुपी परमेश्वरला धन्यवाद दिल्याशिवाय राहवत नाही डॉ शशीकांत जाधव आणि त्यांच्या पत्नी डॉ .सौ संजीवनी जाधव यांच्या या निरपेक्ष कार्याला खूप साऱ्या शुभेच्छा



# एक राज्य, एकत्र राज्य ....||ज्ञानराज्य||

रविराज कुपेकर

**1.फुलस्टॉप - पासून आपण लवकर सावध होऊया....**

आपलं आयुष्य संपवणं सोपी गोष्ट नसुन, खूप अंतिम धाडस म्हणता येईल. काही लोकांच्या आयुष्यात फुलस्टॉप येत आहे की तो आणण्यात येत आहे याचा आपण लवकर विचार करूया.

फुलस्टॉप हा एका virus सारखा पसरत आहे. जिथे विश्वात चांगले लोक आहेत तसे वाईट लोकही आहेत. हा virus हीच लोक पसरवत आहेत. आपल्याला समजण्याच्या पलीकडचा हा विषय आहे, जितक्या लवकर तुम्हाला समजेल,तितक्या लवकर तुम्ही सावध व्हा व या virus ला सडेतोड उत्तर द्या.Virus हा दुसरा कोणी नसून आपल्याला आपल्या मेंदूत पेरण्यात येत असलेले negative विचार आहेत. हे विचार कोण पेरतय ते आपण सावध होऊन, हुशारीने बघितले पाहिजे. हे विचार आपल्यातला सेल्फ कॉन्फिडन्स घालवतात, नंतर आपण जर त्याच्या आहारी गेलो तर तुमचा अंत निश्चित आहे.पण जर तुम्ही धाडस दाखवलंत आणि ती वेळ निघून गेली तर तुम्ही antivrus शोधला म्हणून समजा.येवढच लक्षात असु द्या की "Fortune favours the brave". कितीही संकटे आली, कितीही स्ट्रेस आला तरी या virus ला जे tv, net, चुकीचे मित्र आणि इतर ठिकाणा वरून आपल्या डोक्यात input करण्यात येते त्या पासून थोड लांब राहा,सावध रहा.ते म्हणतात ना "बचेंगे तो और भी लढेंगे" , आपली पण वेळ नक्की येईल, परमेश्वर कधीच आपल्या मुलांवर अन्याय करत नाही. Wait and Watch ही stratergy ठेवा आणि तुम्ही वेळ येईल तेंव्हा त्या

virus ला सडेतोड उत्तर द्या.तेव्हाच आपला विजय होईल.....तयार व्हा, तयार राहा.

**2.मराठ्यांना जमेल.. मराठी माणसाला जोडण्यासाठी....**

एक एक थेंब जेंव्हा डबक्यात अडकतो, तेंव्हा त्याची गत राड आणि चिखलाची होऊन जाते. तीच गत झालेय आपल्या मराठ्यांची, डबक्यात किती वेळ साठून राहणार. एक तर डबकं कोरडं पडेल आणि थेंब मातीत विलीन होईल.पण हाच थेंब जर ठरवेल की मी सागरात विलीन होईन तर..! सागर म्हणून जगेन..!, तर कुणी अडवलय...! पण जरा जपुन, सागरात विलीन होताना ओढा, विहीर, नदी, तलाव आणि बरेच काही लागेल. त्या थेंबाला या सर्व अडचणीतून, सर्व संकटातून जायला लागेल ते फक्त आणि फक्त हुशारीने.एक मराठा जेंव्हा यशाच्या शिखरावर असतो, त्याला नक्की वाटते की दुसरा मराठी माणूस आपल्या सोबत यावा, हाच इतिहास आहे, जे स्वराज्य छत्रपती शिवाजी महाराज आणि असंख्य विश्वासू मावळ्यांनी स्थापन केलं. पण हा इतिहास झाला, त्यांनतर कुठं दिसतं का मराठा - मराठी माणसाने इतिहास घडीवला? आपल्याला त्या स्वच्छ सागरापर्यंत पोचताच येऊ नये हे गणित घालण्यात येते व येत आहे. मराठ्यांनो सावध व्हा कोण परका येऊन आपल्याला या डबक्यातुन बाहेर काढणार नाही.आपणच आपल्या हुशारीने, एकजुटीने व विश्वासाने बाहेर पडू व हजारो मराठयांना चिखल होण्यापासून वाचवूया.सागर जरी कल्पना असली तरी आत्ताची खरी परिस्थिती आहे.जो थेंब हे जाणेल की 'हाताला हात देऊन, बाजूला सर्व जात ठेवून' जर आपण पुढे चाललो तर नक्की एक राज्य, एकत्र राज्य निर्माण होईल.....ज्ञानराज्य निर्माण होईल.तयार व्हा हुशारीने.!

### 3. देवाला सोन्याची गरज आहे का?

सोने, हिरे, चांदी, मोती यात असलेल्या देवाला असे का वाटू नये की आपली प्रजा, आपले भक्त सुखी आहेत.तिरुपती बालाजी, शिर्डी साईबाबा, पद्मनाभन मंदिर आणि बरीच तीर्थस्थाने पैसे आणि सोन्याने भरलेली आहेत, गरज आहे का एवढे साठवण्याची.गरज आहे ती गरजु, कष्टकरी जनता, होतकरू तरुण यांच्या हाताला याच देवाचे हात जोडून नवीन दिशा देण्याची. बळीराजाचे राज्य तेंव्हाच येईल, जेंव्हा त्याच्या मातीत पिकविलेलं धान्य व पीक तो पंढरपूरला विठ्ठलाच्या चरणी अर्पण करील.तिरुपती बालाजीच्या जर लक्षात आलं तर किती बरं होईल,की जो पैसे-सोने दान देतो, त्याला त्याची आवश्यकता नाही. साईबाबा जर विचार करतील की गरिब, लाचार लोक फक्त शिर्डीत नाहीत तर सगळ्या जगात आहेत.तर जग नवीन इतिहास लिहिल, जो इतिहास श्री राम, श्री कृष्ण यांनी लिहायला सुरवात केली. जर साधु, संत माणसा -माणसात दिसायला लागले तर...! विचार सुंदर आणि पवित्र झाले तर, देवच तुमच्या घरा-घरात अवतरेल आणि सुरवात होईल नवीन इतिहासाची,बळीराज्याची.राज्य जे असेल समृद्ध विचारांचे. विचार जे माणुसकीची जपणुक करतील. का नाही गोकुळ परत अवतरणार? का नाही कृष्ण कंस मामाचा परत वध करणार,?या वेळेस मग मामाच्या ठिकाणी काका असेल वा अन्य कोणी , फक्त विचार करा.....ते अवतरतील ते विचारातुन, गरज आहे ती जाणुन घेण्याची.स्वतःला ओळखण्याची.

## 4.आलाय जवळ कर्मधर्म काळ...


जगात आणि आजुबाजुला जे काही घडत आहे, चांगल्या विचारांचा काळ जवळ आला असे वाटत आहे. चांगले लोक जगावे जगत राहावे हेच हा काळ सांगतोय.कर्म चांगले असेल तर धर्म कार्य चांगले होईल. कर्म स्वछ तर धर्म कार्य स्वछ असेल. समजा मनात पाप आणि स्वार्थ,



अऺस्वच्छ विचार आणि द्वेष घेऊन कुठल्या मंदिरात देवा कडे गेलात तर तुमचा अंत जवळ आलाय.देव लवकरच तुम्हाला तुमच्या जागी पोचवेल. प्रभु श्रीराम श्रीकृष्ण हेच बघत असतील की कधी ही पृथ्वी पाप, अन्याय ,अत्याचारापासुन मुक्त होईल. नक्की कल्की अवतार या पृथ्वीला पाप मुक्त करेल व करत राहील.सुरवात झाली आहे, आता मात्र मागे हटू नका, प्रत्येक व्यक्तीने आपलं मनगट घट्ट करा, सत्य आणि विश्वास असेल तर स्वच्छता या पृथ्वीची झालीच म्हणून समजा. देव तुमच्या पाठीशी असेल फक्त मन घट्ट करून जो चुकतोय, चुकलाय चुकत असेल त्याला सांगा की थांब नाहीतर तुझा काळ जवळ आलाय. जे काय करायचे तो परमात्मा बघेल.पण तुम्ही जे चुकतंय ते नाही सांगितले तर तुम्ही पण काळाच्या मार्गावर असाल हे लक्षात ठेवा.... कर्मधर्म काळ कुणालाही क्षमा करणार नाही,मलाही नाही....
हेच दैवीसत्य आहे...

## 5.Holy Bible

Humans are the worst species with best brain than any other animals on earth.




Every human will see a new world when they will be free from fear, and live life with hope for good. On his path Lord Jesus laid one rock of love and one rock of peace. Good people choose and lay their feet on rock of love and spread thoughts of goodness for others and world. On the other side bad people shall choose the rock of peace and in their life never find peace, as they never understand that peace is never achieved without love.Love for themselves,Love for family and friends.On his journey every human wants to be happy in life Lord Jesus explains your journey is like water flowing on land with lots of rocks and sand, rocks to sharpen you and your thoughts, so that you never feel weak in life. Soil that shall make you purer and purer during your journey. The person you become during this journey shall reach Ocean of happiness is what Bible wants.Happiness with love shall light thousands of lamps for peace.

## 6.भगवत गीता


आपण आपल्या आयुष्यात जेव्हा भगवत गीता वाचाल किंवा वाचली असेल, एक समजुन नक्की येतं की, आयुष्य खुप छान आहे आणि आपण सुंदर बनवूया.



आपल्या जीवनात, चांगले प्रसंग येतील आणि नाही आले तरी प्रत्येक प्रसंग हुशारीने,समजुतीने व जबाबदारीने निभावून नेण्याची ताकद हेच गीतेतील

विचार सांगतात.

"कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन "....कर्म करत राहा,फळाची अपेक्षा करू नका,ते आपोआप मिळेल.या युगात आपण आपलं विश्व निर्माण करताना काय कर्म करतो हे खूप गरजेचे आहे. ते म्हणतात ना कर्माच फळ इथच  भोगावं लागतं, पण आयुष्यात वाईट कर्मा पासून चांगले कर्म करायला भगवत गीता शिकवते.गरीब माणसांना,गरजू लोकांना पैश्याचा नसुन विचारांचा धीर देऊन, बाबा सगळं ठीक होईल, मन घट्ट कर,परमेश्वर आहे पाठीशी म्हणणं खूप मदत करून जातं. जेंव्हा तुम्ही अशी विचारांची मदत करता, हीच मदत तुम्हाला एक कर्मदाता म्हणून तुमची आयुष्याच्या वाटेवर कर्मफळ या स्वरूपात परत करते, ही मदत करण्याचे विचार आपल्याला भगवत गितेतून मिळतात. आयुष्यात प्रत्येक व्यक्तीवर प्रेम करणे,चांगल्याला चांगले आणि वाईट विचारांचा विनाश करून धर्म प्रस्थापित करणे हेच विचार प्रभू श्रीकृष्णांनी अर्जुनाला भगवत गीतेतून सांगितले.मदत जरूर करूया...चांगल्या विचारांची.



# निल हर्बल : आयुर्वेदातील विश्वसनीय नाव

नाव -हरीश आनंदा देवरकर
(कंपनी .डायरेक्टर )
मोबाइल नं:8975410972,7774849177
मेल :nilherbal2010@gmail.com

सर्वात प्राचीन व्याधी बरी करणारे शास्त्र म्हणून आयुर्वेद ओळखले जाते. आयु म्हणजे जीवन आणि वेद म्हणजे शास्त्र असे हे जीवनाचे जगण्याचे शास्त्र आहे. या शास्त्राचा उगम भारतात साधारण ५००० वर्षापूर्वी झाला. म्हणूनच याला सर्वात प्राचीन शास्त्र म्हंटले आहे.

काळाच्या ओघात अनेक नव्या शाखा, शास्त्रे वैद्यकीय क्षेत्रातील निर्माण झाली . तरीपण आयुर्वेद आपला वेग आणि महत्व टिकवून आहे. आणि येणाऱ्या भविष्यकाळात लोकांना आयुर्वेदाविषयी दुसरा चांगला पर्याय नसेल.

आयुर्वेद हे पहिले शास्त्र आहे ज्यामध्ये शरीर व आत्मा यांच्या सहाय्याने व्याधी बऱ्या केल्या जातात. हे शास्त्र वनस्पती वर्ग, प्राणी वर्ग आणि पर्यावरणावर आधारलेले आहे आणि म्हणूनच ५००० वर्षाच्या इतिहासात ते टिकून आहे. हे शास्त्र शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्य निसर्गाच्या सहाय्याने टिकविण्यास मदत करते. आयुर्वेद फक्त आजारी लोकांना सुद्धा उपयुक्त आहे.

आयुर्वेदाची हीच परंपरा आणि वसा “निल हर्बल “ मागील ८ वर्षांपासून चालवत आहे. २०१० साली या कंपनीची स्थापना झाली. लोकांना चांगला उपचार आणि गुणकारी औषधे कमीत कमी खर्चात उपलब्ध करून द्यायची या एकाच उद्देशाने कंपनीची स्थापना झाली. सुरवातीला काही मोजक्याच औषधांची निर्मिती करणारी कंपनी आज औषधासोबतच सौंदर्य प्रसाधने फूड सप्लीमेंट इत्यादीची पण निर्मिती करू लागली आहे. हे अर्थातच शक्य झालं आमचे सहयोगी डॉक्टर

आणि ग्राहकांमुळे. चांगली दर्जेदार उत्पादने लोकांना देण्याचा प्रामाणिक प्रयत्न कंपनी करते आणि म्हणूनच निल हर्बल हे आयुर्वेदातील एक विश्वसनीय नाव ठरले आहे.

निल हर्बल आज संपूर्ण महाराष्ट्र,कर्नाटक,गोवा मधील काही भागात कार्यरत आहेत. जवळपास २५० व्यसनमुक्ती केंद्र कंपनीकडून चालवली जात आहेत.दारू,तंबाखू,गुटखा,सिगारेट सोडवण्यासाठी सर्वात परीणाम कारक औषधांची निर्मिती निल हर्बल कंपनी करते. त्यासोबतच संपूर्णपणेग्रंथोवन आधार असलेली औषधे,सांधेदुखी, अस्थमा, मूळव्याध, शुगर,वजन कमी करणे,वजन वाढविणे , अपचनाचा विकार , स्मुर्तीभ्रंश होणे ,मुतखडा इत्यादी आजरावरती रामबाण उपाय असणारी औषधे कंपनी बनवते.

सध्या जगभरामध्ये मधुमेहाचे प्रमाण वाढत आहे . भारतामध्येही प्रत्येक घरामध्ये एकदातरी मधुमेह असणारा व्यक्ती सापडतो . मधुमेह आणि त्याच्यावरील उपचारामुळे होणाऱ्या काही दुष्परिणामांचा कंपनीने अभ्यास करून एक अतिशय गुणकारी औषध बनविले आहे . जे मधुमेह नियंत्रणात मदत करतेय शिवाय थोड्याच कालावधीत एलोपॅथी औषधांपासून सुटका करायला मदत करते .येणाऱ्या पेशंटला पहिल्या महिन्याचे औषध मोफत दिले जाते .जेणेकरून त्या पेशंट ने ते औषध वापरावे आणि त्याचा रिझल्ट अनुभवावा. आज शेकडो लोक या औषधाचा वापर करत आहेत आणि त्यांना याचा लाभ सुद्धा होतोय.

आज आर्युवेद ही प्रत्येक मानवी शरीराची गरज बनली आहे आणि याचाच विचार करून कंपनी या क्षेत्रामध्ये काम करत आहे . सर्वानीच जास्तीत जास्त या पद्धतीचा अवलंब करून आपल स्वास्थ्य

टिकवून ठेवावं आणि आपला हा प्राचीन वारसा जतन करावा हीच अपेक्षा . सर्व वाचकांना चांगले आरोग्य लाभो हीच सदिच्छा आणि दिपावलीच्या खूप शुभेच्छा ..

आयुष्यात चारी ठिकाणा वरून जरी
हार झाली, तरी पाचव्या ठिकाणी
कशी संधी मिळेल व विजय कसा
होईल हे बगुया..

रविराज कुपेकर






# NIL HERBAL

**Back to Nature**

NIL HERBAL
Remarkable Medicine,
Remarkable Care
EST 2010

**सांधेदुखी,अस्थमा,मधुमेह,
वजन कमी करणे
व वाढविणे इ. आजारावरती
गुणकारी आयुर्वेदिक
औषधे उपलब्ध**

## Redefining
# Ayurveda

# NIL HERBAL PRODUCTS

| जगातील सर्वात मोठी व्यसनमुक्ती केंद्राची साखळी

| आयुर्वेदिक उपचार पद्धती

| हर्बल पावडर , चूर्ण आणि औषधे

**Address**

**NIL HERBAL PVT. LTD.**

**Regional Office :** Nehru Chowk,Gadhinglaj,Dist.Kolhapur - 416502, Maharashtra

**Contact :** 8975410972,7774849177 **Email :** nilherbal2010@gmail.com

ISO 9001 : 2015 Certified company

# बाबा ॲग्रो फूड इंडस्ट्रीज

हारूर ता.आजरा,जि.कोल्हापूर.



नवी दिवाळी ,नवे वर्ष,घेवून आली उल्हास वर्ष,
हि दिवाळी घेवून येवो ,तुमच्या स्वप्नपुर्तीचा संदेश.



राणोजी उर्फ बाबा शिंदे

प्रोपा-युवराज राणोजी शिंदे

## सर्वांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

घरचा पत्ता - मु.पो.उंबरवाडी,ता.गडहिंग्लज,जि.कोल्हापूर.
फोन - 9702633111 , 7888238888

## योग्य सेवा - तत्पर आणि उत्कृष्ट सेवेसाठी कटिबद्ध

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA



## मा. श्री-अजित अशोक देसाई

सदस्य अभिकर्ताओ के लिये मंडल प्रबंधक क्लब
मोबा- 9423825978

जन्माला येणाऱ्या बाळापासून ६५ वर्षापर्यंतच्या सर्वांसाठी विमासेवा
उतरत्या वयात आयुष्यभर पेन्शनची सोय उपलब्ध
आपल्या मुलीच्या लग्नाच्या खर्चाची तरतूद व आयुष्यभर दरवर्षी माहेरकडून आहेर म्हणून प्रेझेंटची सोय

भारतीय जीवन बीमा निगम
ऑ - शाखा 94L , ट्रेड सेंटर , दूसरा मजला , स्टेशन रोड , कोल्हापूर - 416001
निवास - प्लॉ. नं. 46 , श्री राम कॉलनी , शिवतारा कॉम्प्लेक्स जवळ , तामगाव रोड ,उजळाइवाडी , कोल्हापूर

# राजकीय क्षेत्रातील अशाही संधी

डॉ. शुभांगी माने इतिहास विभाग

राजकारण म्हंटलं कीं बऱ्यापैकी जणांचा आवडता अन् काहींचा तितकाच नावडताही विषय. एकमेकां-वरती डावपेच करणं, समोरच्याला हरवण्या साठी प्रयत्न करणं, विविध तंत्राचा वापर करून विजय मिळवणं असं काहीसं चित्र आपल्या समोर उभं राहतं. यासाठी एक ना अनेक फंडे राजकीय नेते वापरताना दिसतात.काही तरुणाना मात्र अशा नेत्यांसोबत राहणं, फिरणं, त्यांना सहकार्य करणं यामध्ये जास्तच रस असतो. आपला पक्ष किंवा उमेदवार निवडून यावा यासाठी काहीही करणारी ही 'कार्यकर्ते ' मंडळी आपल्याला पाहायला मिळतात. परंतु आपला मुलगा एखाद्या नेत्यांच्या मागे फिरतो याबाबत आईवडीलांमध्ये किती नाराजी असते हेई काही सांगायलाच नको. आपला मुलगा काही कामधंदा न करता असं फीरत असेल तर घरच्यांची नाराजी साहजिकच आहे. एवढं असूनही मुलाला मात्र राजकीय क्षेत्र सोडायचं नसतं. त्याला त्याच्या मध्येच खूप रस असतो. अशा वेळी राजकीय क्षेत्रावरच राजकारण करून त्यातून योग्य मार्गाने स्वतःसाठी पैसे मिळवले तर मात्र काही बिघाड णार नाही ना?म्हणूनच राजकीय क्षेत्रातील काही अशा संधींबद्दल जाणून घेऊ ज्या आपल्याला आर्थिक मोबदला मिळवून देतील. त्याने आपले राहणीमान उंचावेल सोबत आपल्या आवडत्या क्षेत्रात काम करण्याचा आनंदही मिळेल.- जनसंपर्क अधिकारी- राजकीय नेत्यांचे यशापयश हें त्यांच्या संपर्कातील लोकांवर अवलंबून असतं. त्यामुळं नेत्यांच्या चांगल्या कामांची माहिती जेवढ्या जास्त लोकांपर्यंत पोहचवेल तेवढा त्यांचा विजय निश्चित होत असतो. वृत्तपत्र, रेडीओ, टीव्ही यातून

बातम्या देऊन  तसेच विविध कार्यक्रम आयोजित करून लोकांपर्यंत पोहचण्याचं काम केलं जातं. या कामासाठी नेते जनसंपर्क  अधिकार्यांची नेमणूक करतात. विविध माध्यमं वापरून हीच माहिती लोकांपर्यंत पोहच वण्याचे काम जनसंपर्क अधिकारी करत असतो.इतरांचे उणेदुने न काढता फक्त स्वतःच्या नेत्याबद्दल चांगली माहिती  देण्याचे  हे काम असतं. असं काम करणार अधिकारी  होणं ही चांगला पगार मिळवून  देणारी नोकरी ठरू शकते.-

खासगी मदतनीस (पीए)-  नेता हा विविध कामांमध्ये व्यस्त असतो. सगळीच कामं त्याला स्वतःला करणं शक्य नसतं. काही वेळेला लोकांना प्रत्यक्ष भेटणेही शक्य नसतं. अशावेळी नेतेमंडळी महत्वाची कामं  आपल्या पीए वरती सोपवत असतात. नेत्याचं भाषण लिहणं , सगळ्या कार्यक्रमांचे नियोजन करणं, लोकांना भेटून त्यांच्या समस्या जाणून घेणं, त्यांना प्रतिक्रिया  देणं, नेत्याला येणारे फोन घेणं अशी कामं पीए करत असतात. संयम, हजरजबाबीपणा, बुद्धीचा चलाख-पणे वापर, बोलण्यात पटाईत आणि  प्रचंड एनर्जी असणारी व्यक्ती हे क्षेत्र उत्तमरित्या सांभाळु शकते. काही नेत्यांचे दोन पेक्षा अधिक पीए असतात त्यामुळं या क्षेत्रात येण्यास हरकत नाही.

सोशल मिडीया हॅंडल- सोशल मिडीया हें कोणतीही गोष्ट क्षणात व्हायरल म्हणजेच प्रसारित करण्याच माध्यम. नेत्यांचे विविध कार्यक्रम,राबविलेले चांगले उपक्रम हे जर सोशल मिडियावर प्रसारित केले तर निश्चितच त्या नेत्याबद्दल  जनमतामध्ये चांगला विचार घडत असतो. म्हणूनच नेत्यांची माहिती सोशल मिडियावर देण्यासाठी सोशल मिडिया हाताळणारी व्यक्ती आवश्यक असते. सोशल मिडियाचे ज्ञान

असणारी आणि अचूक लेखनाची क्षमता असणारी व्यक्ती या संधीचा फायदा घेऊ शकते.

जाहिरात संस्था- जाहिरात हें एक झपाट्याने वाढणार क्षेत्र आहे. आपलं काहीही लोकांसमोर मांडायचं असेल, लोकांना पटवनू द्यायचं असेल तर जाहिरात हे एक प्रभावी साधन ठरतं. नेत्यांनाही जाहिरात करण्याची आवश्यकता सतत पडत असते. त्यामुळे जाहिरात बनवनू देण्याचे काम करणंही मोबदला मिळवून देते. स्वतः जाहिरात बनवून द्यायचं काम सुरु केल्यास एकापेक्षा जास्त नेत्यांच्या जाहिरात बनवून देता येतील यातून मिळणार आर्थिक उत्पन्न निश्चित अधिक असतं. पाहणी आणि विश्लेषण तज्ञ सध्या आपण बघतो की निवडणूक लागायच्या आधीच जनमत कोणाकडे आहे , कोणाच्या किती सीटा येतील याबाबत अंदाज बांधणी सुरू असते. बऱ्याच वेळेला हे अंदाज खरे ठरतात या पाठीमागचा कारण असं की, काही व्यक्ती सर्वे करून जनमताची तपासणी करत असतात. यावरून राजकीय नेत्यांची सूत्र हलत असतात. यामुळं अशा प्रकारचा सर्वे करून त्याबद्दलचं विश्लेषण करून लोकांचा कल दाखवणाऱ्याना खूप मागणी आहे. त्या माध्यमातून राजकीय नेत्यांनी काय केल्यास जनमत अधिक मिळेल किंवा ते टिकून राहील यासंबंधीत माहिती मिळत असते. म्हणूनच सर्वेच्या माध्यमातून विश्लेषण करून देणाऱ्या व्यक्तींच्या गटास मोठा मोबदला दिला जातो. शासकीय योजनांचे तज्ञनेत्यांना मिळणारा फंड, तो कसा आणी किती व कोणत्या योजनेसाठी वापरायचा याबद्दल नेते कधी कधी संभ्रमात असतात. तसेच मिळालेल्या निधीतून योग्य प्रकारे काम करून घेण्याची ही जबाबदारी असते म्हणून विविध शासकीय योजनांची माहिती

असणाऱ्या व सरकारी अधिकाऱ्यांशी संपर्क असणाऱ्या तज्ञांची गरज नेत्यांना भासत असते. अशा प्रकारे व्यक्तीमत्व असणारी व्यक्ती नेत्यांना निधीच्या योग्य खर्चाबद्दल माहिती देत असते आणी याबद्दल त्यांना मोबदला देण्यात येतो.- वेबसाईट किंवा एॅल्पिकेशन डिझायनर नेत्यांनी विविध प्रकारची कामे केलेली असतात किंवा करतही असतात अशा वेळी त्यांची संपूर्ण जनतेला माहिती देता यावी यासाठी ती माहिती अॅप्लीकेशन किंवा त्यांच्या वेबसाईटवर पाठवली जाते. यामध्ये काही वेळेला संपर्क करण्याची मुभाही देण्यात आलेली असते. त्यामुळे इंटरनेट वापरकर्त्या जनतेच्या नजरेसमोर सतत त्या नेत्यांची कामे या माध्यमातून दाखववली जात असतात. तसेच लोकांनी काही प्रश्न विचारल्यास किंवा अडचणी मांडल्यास त्यावरही येथे प्रतिक्रिया देण्यात येतात. म्हणजेच लोकांच्या अधिक जवळ जाण्यासाठी वेबसाईटवर किंवा अॅप्लीकेशन डिझायनर आवश्यकता असते. मोठमोठया आयटी कंपण्या अशी कामे घेत असतात. काहीजण याची वैयक्तिकपणे सुरुवात करून कालांतराने इतरांनाही रोजगार उपलब्ध करून देऊ शकतात. असंही हे क्षेत्र असून यामध्ये चांगला मोबदला मिळतो. एकंदरीत नेत्यांची फक्त सोबत न करता त्यांच्या यशासाठी त्यांना मदत करता येते. मदतीच्या बदल्यात आपल्याला मोबदलाही मिळणार ही एक जमेची बाजू. म्हणूनच राजकारणाकडे एका वेगळ्या दृष्टीने बघितल्यास पैसे मिळवनू देणारं हे एक उत्तम साधन असल्याचं लक्ष्यात येईल. निश्चितच यापैकी काही क्षेत्रांचा विचार करून यामध्ये करिअर केल्यास फायद्याचंच ठरेल.

# ग्लोबल वॉर्मिंग : परिणाम व उपाय

माणिक सागर देसाई मोबाईल – ९०४९२८२६९४

ग्लोबल वॉर्मिंगमुळे संपूर्ण पृथ्वीचे तापमान वाढणे याचा अर्थ संपूर्ण पृथ्वी सारखी  गरम होत आहे. वैज्ञानिकांचे असे म्हणणे आहे कि, येणाऱ्या काही दिवसात पृथ्वीवरील उष्णता वाढेल, महापुराच्या घटना वाढतील, वादळे व पावसाचे प्रमाण कमी जास्त होत राहिल. यासाठी ग्लोबल वॉर्मिंग काय आहे. जाणून घ्यावे लागेल.

अगदी सोप्या भाषेत सांगायचे म्हणजे पृथ्वीच्या तापमानात दिवसेंदिवस वाढ, पावसाच्या अर्थात सर्व ऋतुमानांत होणारे परिवर्तन यामुळे पृथ्वीवरील उष्णता वाढत आहे. पावसाच्या प्रमाणात वाढ / कमी अचानक होत आहे. बर्फाळ प्रदेशातील हिमखंड व ग्लेशियर अचानक वितळत आहेत. समुद्राच्या जलस्तरामध्ये वृद्धी होत आहे. वनस्पती व प्राणी यांच्यावर हि या हवामान बदलाचा परिणाम होत आहे.

ग्लोबल वॉर्मिंग हि पृथ्वीची सर्वात मोठी समस्या आहे. हे सर्वसामान्य माणूस समजू शकत नाही. त्याला हा शब्द वैज्ञानिक दृष्ट्या टेक्निकल वाटतो  यामुळे तो यावर फारसा वेळ देत नाही. किंवा समजावून घेण्याच्या मनस्थितीत नाही. किंवा तो याला वैज्ञानिक बदल असे समजून सोडून देत आहे. जगातील जास्तीत जास्त लोकांना तर ग्लोबल वॉर्मिंग मुळे जगाला कोणताही धोका नाही असे वाढते.

भारतामध्ये पण ग्लोबल वॉर्मिंग हा शब्द प्रचलीत नाही आहे. कायम धावपळीत असणाऱ्या भारतीयांना या प्रश्नावर खोलात जावेसे वाटत नाही. परंतु विज्ञानाच्या भाषेत सांगायचे झाले. तर ग्लोबल

वॉर्मिंग हि २१ व्या शतकातील सर्वात मोठी समस्या आहे. हि समस्या जगाच्या तिसरे महायुद्ध व एखादा परग्रह पृथ्वीला टक्कर देईल यापेक्षाही हि समस्या मोठी आहे.

**कारण -**

ग्लोबल वॉर्मिंगमुळे पृथ्वीवरील पाण्याच्या साठ्यामध्ये कायम परिवर्तन होत आहे. याला जबाबदार ग्रीनहाउस गॅस आहे, बाहेरून येणाऱ्या उष्णतेला आपल्या अंतर्गत सामावून घेणाऱ्या गॅसला ग्रीन हाउस गॅस म्हणतात. ग्रीनहाउस गॅसचा उपयोग, सर्वाधिक थंड प्रदेशामध्ये केला जातो. थंड प्रदेशातील वनस्पतींना कायमस्वरूपी गरम सहण्यासाठी या गॅसचा उपयोग केला जातो. हि पिके व वनस्पती एका बंद काचेच्या घरात घेतली जातात. हि काचेची घरे ग्रीनहाउस गॅसनी भरलेली असतात. हा ग्रीनहाउस गॅस सूर्याच्या उष्णतेला कमी करतात व आतील वनस्पतींना गरम राखण्यास मदत करतात. सेम अशाच प्रकारची प्रक्रिया पृथ्वीवर होत आहे. पृथ्वीवर येणारी सूर्याची किरणे काही प्रभागात शोषून आपली पिके व वनस्पती शाबूत ठेवली जातात. ग्रीनहाउस आमच्याकडे नसते तर पृथ्वीवरील तापमान आतापेक्षाही कमी असते.

**घातक परिणाम -**

पृथ्वीवरील कार्बनडाय ऑक्साईडची वाढ होत आहे. त्यामुळे ऑक्सिजनची मात्रा कमी होते. पर्यायाने तापमान वाढते. परिणामी तापमान ३ डिग्री वरून ८ डिग्री वाढेल. त्यामुळे बर्फाळ प्रदेशातील बर्फ वितळायला चालू होईल.समुद्राची पाण्याची पातळी वाढेल.ग्लोबल वॉर्मिंगला बचाव करण्यासाठी आपण पृथ्वीला हिरवीगार राखणे गरजेचे

आहे. आपल्या जवळपासचे वातावरण प्रदूषण मुक्त ठेवणे गरजेचे आहे. या गोष्टी जर आपण केल्या तर पृथ्वीला आपण ग्लोबल वॉर्मिंग पासून वाचवू शकतो.

आपल्या देशामध्ये ग्लोबल वॉर्मिंगच्या समस्ये बद्दल जागृकता कमी आहे. आपले शेतकरी ह्या समस्ये पासून अनभिज्ञ आहेत. हवामान खात्याकडून शेतकऱ्यांना अचूक अंदाज दिला जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होते. त्याचे नुकसान म्हणजे संपूर्ण देशाची अर्थव्यवस्था कोलमडते. थोड्याच दिवसापूर्वी केरळ राज्यात आलेला महापूर, वांरवार येणारी किनारपट्टीवरील वादळे, प्रचंड होणारी मनुष्य हानी, नुकसान हे सर्व ग्लोबल वॉर्मिंगचा परिणाम आहे. आपल्या शहरातून वाढलेली प्रचंड वाहणांची संख्या त्या वाहणातून निघणारा धूर हा पर्यावरणातील कार्बनडाय ऑक्साईड वाढवण्यास मदत करतो. आपल्या प्रचंड वेगाने वाढणाऱ्या औद्योगीक श्रेत्रातून प्रंचड असे धुराचे लोट आपण पर्यावरणात फेकत आहोत. त्यामुळे ऑक्सिजन बार हि संकल्पना पुढे येत आहे.

ह्या वर उपाय म्हणून सर्वात आधी उपलब्ध असणारे जंगल, वने हे वाचवले पाहिजेत. सर्वात आधी वृक्ष तोडीवर बंदी घातली पहिजे. जंगलाचा होणारा ऱ्हास त्यामुळे तिथल्या प्राणीमात्राचचा विस्थापित होणारा प्रश्न सोडविला पहिजे. आपले नदी, समुद्र, पर्वत, डोंगर हे वाचवले पाहिजेत.

आपल्या दैनदिन जीवनात लागणारी वीज हि सर्वात जास्त कोळशा पासून तयार होते. आपण जास्तीत जास्त पवन ऊर्जा व सौर ऊर्जेचा वापर केला पहिजे. जंगल संपती वाचवण्यासाठी जंगलाला लागणारे

वणवे रोखले पाहिजेत तरच जंगले वाचतील. भारतीय जनता व शेतकरी यांना ग्लोबल वॉर्मिंग बद्दल माहिती मिळून त्यांच्यात जागृकता व्हावी हिच माफक अपेक्षा.




CHAIRMAN
Mr. SANJAY SHUKLA
Mob - 9351613639

**BRAND MADE IN INDIA
INDIAN LION
VELVET PENCIL**

- Manufacturer
- Dealership
- Retailer
- Contract Job Works

CEO
Mr. Shridher Mense
Mr. Rohit Murkute
Mob - 7020560269
9075665944

**OWNERDED BY
S.R. GROUP OF COMPANIES
PVT. LTD SHINOLI BK.MH**

NILAY ENTERPRISE AHMEDABAD
BRAND - INDIAN LION VALVET PENCIL

At/Post-Shinoli BK , Tal : chandgad, Dist - Kolhapur

**दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा**
ग्रामपंचायत सूळे ,
ता. आजरा

सौ. शिलाताई म. सुतार - सरपंच
सौ. भारता बाबूराव फडके - उपसरपंच
श्री. अनिल भिमराव फडके - सदस्य
श्री. महेश उत्तम सुतार - सदस्य
श्री. अमित विष्णु फडके - सदस्य
सौ. आशाताई शांताराम फडके - सदस्य
सौ. शांता वसंत रेडेकर - सदस्य
श्री. एस. डी. किरूळकर - ग्रामसचिव
श्री. मोहन मारुति कांबळे - कर्मचारी
श्री. शामराव तुकाराम कांबळे - कर्मचारी
श्री. सुधीर अशोक फडके - कर्मचारी



# जीवन ज्योत क्लिनिक

वेळ-सकाळी ९ ते २
सायंकाळी ४ ते ९

डॉ.एस.एल.जाधव
B.A.M.S.C.G.O.

डॉ.सौ.एस.एस.जाधव
B.A.M.S.

मारूती मंदिरजवळ ,महागांव, ता.गडहिंग्लज,जि.कोल्हापूर, फोन : (02327)276036 , 9822428381






## ★ उपलब्ध सुविधा ★

- फॅमिली फिजीशियन
- ॲडमिटची सोय
- मधुमेह व उच्च रक्तदाब
- स्त्रीरोग व बालरोग उपचार

पश्चीम महाराष्ट्रातील सर्वात जूने व विश्वसनीय व्यसनमूक्ती केंद्र

**२४ तास अत्यावश्यक सेवा**

## Visiting Doctors

डॉ.प्रविण भरती
हाड तज्ञ
दर सोमवार . संध्या 4.30 ते 6.30



एकमेका सहाय्य करू सगळे होऊ श्रीमंत
रयत ॲग्रो इंडिया गडहिंग्लज.
पटट्णशेटटी बिल्डींग , डॉक्टर कॉलनी , साई मंदिर रोड, गडहिंग्लज
चला उद्योजक होऊया ...
इतिहास घडवूया
100 % हमी भावाने सर्व उत्पादित उत्पादनाची
खरेदी आम्हीच करतो
कमी गुंतवणुकीत भरपूर फायदा मिळवा
आधुनिक शेतीबरोबर करा
कडकनाथ कुक्कुटपालन
महाराष्ट्र , कर्नाटक , राजस्थान , तेलंगणा , मध्यप्रदेश
प्रोजेक्ट सुरू आहेत.
एकदा आवश्य भेट दया.
आपल्याच गावामध्ये व्यवसाय करण्याची संधी आमच्यासोबत
इतर उद्योजक लाखो रूपये मिळवतात.....मग तुम्ही का नाही ?
रोज एक तास काम करून लाखो रूपये कमवायची संधी.
संपर्क : गडहिंग्लज-8080774647,आजरा-9890989971 ,चंदगड-7720832818 ,
भुदरगड-9527388330 , कागल-7588829966 , निपाणी - 9049635276 .




डॉ.अंकुश शिंदे
७४४७४५८६१३
(BDS)
श्री साई डेंटल क्लिनिक
रजि.नं.A-२४७७१
मारुती मंदिर शेजारी , शिंदे कॉम्प्लेक्स , महागांव
उपलब्ध सुविधा
• दात काढणे • रूट कॅनाल ट्रीटमेंट • दातांची कवळी बसविणे • डेन्टल इम्पाल्ट
• दातांच्या कलरचे सिमेंट बसविणे • वेडेवाकडे / पुढे आलेल्या दातांची ट्रीटमेंट
• दात क्लीन करणे • फिक्स / काढघालीचे दात बसविणे • दात पांढरे करणे
•लहान मुलांच्या दातांचे प्रॉब्लेम • इंन्ट्राओरल कॅमेरा • अक्कल दाडेच्या टाकेची ट्रीटमेंट
नेसरी शाखा
डॉ. अनिल यादव
वेळ
सकाळी ९ ते २.३०
व संध्या ५ ते ९
श्री साई
दातांचा दवाखाना
एक वेळ येऊन जरूर भेट द्या

# आपले दातांचे आरोग्य

डॉ.अंकुश शिंदे(BDS) 8412962637

आपले मौखिक आरोग्य हे आपल्या सर्वसामान्य आरोग्याचा अति महत्त्वाचा भाग आहे. यासाठी दातांची निगा राखण महत्त्वाचे आहे त्यासाटी दात किडू नये म्हणून काय काळजी घ्यावी.

१] ब्रश व गुळण्या याद्वारे दात स्वच्छ ठेवावे रोज दोन वेळा दात घासावे.[ सकाळी आणि रात्री झोपण्यापूर्वी ]

२] ब्रश दर तीन महिन्यांनी बदलावा.

३] जिभेवरची घाण काढण्यासाठी टंग क्लिनर वापरावे.

४] जेवण अडकत असल्यास काड्या न वापरता डेंटल फ्लॉसचा वापर करावा.

५] वेडे वाकडे दात असल्यास अन्नकण अडकून कीड लागू शकते तेंव्हा दात सरळ करण्याची ट्रीटमेंट करून घ्यावी.

६] एखादा दात काढला असल्यास त्याजागी दुसरा दात न बसवल्यास कालांतराने इतर दात त्याजागी सरकतात व कीड लागणे,हिरड्या खाली सरकणे, हिरड्या सुजणे, असर त्रास उदभवतात.

७] गोड पदार्थचे अतिसेवन टाळावे .

८] डॉक्टरांचा नियमित सल्ला घ्यावा.

९] फ्लोराईट युक्त पेस्टचा वापर केल्यास अति चांगले दात सेन्सिटीव झाले असल्यास सेन्सिटीव टूथपेस्टचा वापर डॉक्टरच्या सल्ल्याने करावा.

१०] दात दुखत असल्यास घरगुती उपाय करणे कधी कधी घातक असू शकते. जसे कि झाड पाल्याचा वापर करणे, दातांमध्ये तंबाखू धरणे,

चिक घालणे. गोळीचे अतिसेवन करणे त्यामुळे आपण दुसऱ्या आजाराला बळी पडू शकतो.

११] लहान मुलाच्या दातांची चांगली काळजी घ्यावी त्याच्यावर आपले पुढील येणारे दात चांगले व योग्य ठिकाणी येतात.

१२] वृद्ध लोकांचे दात पडल्यानंतर त्याजागी कवळी किंवा डेंटल इम्प्लांट च्याद्वारे दात बसवता येतात त्यामुळे जेवण बारीक होऊन पचनक्रिया चांगली राहते .

१३] प्रत्येक सहा महिन्यांनी डेंटल चेकअप केल्यास योग्यवेळी दातांची कीड लागली असल्यास त्याला योग्य वेळी रोखता येते.

१४] कधी कधी मुले बोटे,अंगठा,ओठ चोकतात त्यामुळे दातांची रचना बदलू शकते तसेच काही मुले तोंडाने श्वास घेतात त्यामुळे तोंड उघड राहून दात किडण्याचे प्रमाण वाढते अशावेळी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

आपण या सगळ्याकडे गांभीर्याने लक्ष्य दिल्यास आपले मोखिक आरोग्य चांगले राहते व त्यामुळे आपले शरीरही चांगले राहते .

# "मास्तरांचा मार"

ॲड. दिग्विजय वि. कुराडे

पावसाळ्याचे दिवस. नविन वह्या पुस्तकांचा वास. शालोपयोगी साहित्यांची रेलचेल. नविन वर्गात बाकडे पकडण्यासाठी धडपड. वेळापत्र कातला गोंधळ. विषय ओळख... आणि एक अनाहून भीती. का कुणास ठाऊक? पण एक भीती असायचीच. भीतीचं सर्वात अग्रगण्य कारण म्हणजे शिक्षक. नविन शिक्षक कोण असेल कसा असेल. हीच ती अनाहूत भीती. कारणही तसे तगडेच. माझ्यासारख्या त्यावेळी अजिबात 'स्टेज डेअरिंग' या गोंडस नावाने संबोधल्या गेलेल्या महाविशेषणाचं सामर्थ्य नसणा-या अनेक शाळक-यांची मास्तर' ही भीतीच. सर कसे असतील आणि आपल्याला कधी उठवतील याचा नेम नसायचा. म्हणून ही भीती.

मास्तरांच्या भीतीचे आणखी एक बलदंड कारण म्हणजे मास्तरांचा मार. कोणतं गणित सोडवायला सांगीतील आणि जमलं नाही तर तळहातावर किती फुटपट्टयांचा मार खावा लागेल ही भीती. काही विषयांना बाई' होत्या. वध्स पसचसवूत्याच बाई. त्यांचा मार आणि मास्तरांचा मार याची तुलना केली तर एकसारखंच वनज' भरायचं. किंबहूना बाईंचा मारच जास्त लागायचा. मास्तरांच्या माराची कारणंही तषी कायदेषीरच. गृहपाठ न करणं वहया पुस्तके स्वच्छ न ठेवणे टवाळक्या करणं उठवून प्रश्न विचारल्यावर उत्तर देता न येणं, वर्गात लक्ष नसणं, वर्गात झोपणं, तासावर खाणं, अस्वच्छ असणं, शिळा चुकविणं, दुपारवरून पळून जाणं, शालेय विद्‌यार्थ्यांनं जे करणं अभिप्रेत नाही त्या सगळया गोष्टी करणं या माराची कारणे. यादी

बरीच वाढवता येईलही. पण  पुरे. जसा वर्ग पुढे जाईल तशी कारणंही बदलली.

उदाहरणार्थ माध्यमिकच्या वर्गातली मार खाण्याची कारणे म्हणजे नको त्या जागांवर लाल बदाम-बाण काढणे, अनेक व्याकरणाच्या चूकांसह प्रेमपत्र लिहीण्याचा प्रयत्न करणे,  खेळ सुरू असताना गट करून मारामा-या करणं, तास चुकवून सिनेमाला जाणं, जीवापाड आवडणा-या शाळेच्या साहीत्याची नासधूस करणे, वर्गात स्टाफरूममध्ये खाजकुजली टाकणं,  कॉपी करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणं वगैरे वगैरे......आदिंसह अनेक कारणांनी मुलं मार खायची. माझ्या वर्गाच्या व त्याच्या आधिच्या प्रत्येकाने वरील एकातरी कारणाकरीता एकदा ना एकदा 'हा मार' खाल्लेलाच असणार. मी वरील कारणांमधील जवळपास सगळया कारणांकरीता शिक्षा भोगलेला माणूस आहे. असो.

शिक्षेचे प्रकार हा दुसराच मद्दा. प्रत्येक मास्तरांची आणि बाईंची शिक्षा देण्याची पध्दत ही निराळीच. हात पुढे करून तळहातावर लाकडी फुटपट्टीचा मार खाणे ही एक सर्वमान्य शिक्षा. थोडीशी कमी तीव्रतेची मागं किंवा पुढं पायाचा अंगठा धरून उभारण्याची शिक्षा थोडीशी अधिक जड' पण सगळयात अधिक क्लेषदायक शिक्षा म्हणजे शिक्षा भोगणा-या विद्यार्थ्याने वर्ग मित्र किंवा मैत्रीण यांच्या करवी मार खाणं. इतिहास-भूगोल नागरीकशास्त्रला हात वर करून उत्तर देणारा मी. गणिताची उत्तरे मात्र कधी देऊ शकलो नाही आणि म्हणून त्या विषयासाठी जवळपास वर्गातल्या सगळया मुलींकडून थोबाड रंगवून घेतले. त्यामुळे त्या विषयीचा व्देष अजूनही कायम आहे. कधी मधी त्यावेळी मारणा-या माझ्या वर्गमैत्रिणी अचानक माझ्या समोर आज

बाजारात आपल्या लेकरांना घेऊन समोर येतात आणि दोघांनाही नकळतच हसू फुटते. असो. पण त्यावेळी अव्यवहार्य वाटणा-या शिक्षा या व्यवहारी होत्या. याचं भान आज होतंय. प्राथमिक शाळेत शाळा सोडून पळून जाण्याबद्दल देशपांडे बाई, आलूरकर बाई, दळवी गुरूजी यांची शिक्षा भोगली नसती तर आजही मैदान सोडून पळून जाण्याचीच वृत्ती राहीली असती. पाढे पाठ होत नसल्याबद्दल गाताडे सरांचा मार खाल्ला नसता तर, आयुष्याचं गणितच जमलं नसतं. टवाळक्या करण्यांवरून चव्हाण मास्तरांचा मार खाल्ला नसता तर कदाचीत आयुष्य टवाळक्यात गेलं असतं. विज्ञानशास्त्रांची समिकरणे फळयावर लिहीण्याकामी गुळवणी बाईंचा काठीचा मार सर्वांसमोर बसला नसता तर, जीवनाची समीकरणेच बदलली असती.

'मास्तरांचा मार' होता म्हणून शिक्षकांना आदर होता. विद्येला किंमत होती. शिळेला प्रतिष्ठा होती. मुल्यांना व तत्वांना जागा होती हीच ती 'आदरयुक्त भीती' होती. जी शिक्षकांना गुरूवर्य बनवायची. पण, आज हे सर्वच दुर्मिळ होत चाललंय. शासनाने नविन 'नियम' काढलाय म्हणे. विद्यार्थ्यांना धाक दाखवायचा नाही म्हणून. विद्यार्थ्यांची आणि विद्यामंदीरांची मुल्यांकनेच त्यामुळे खालावत चालली आहेत. असे माझे ठाम मत आहे.

माझ्या आयुष्यातील एक शिक्षा माझ्यासाठी खास ठरली. कुठल्याही कारणाला, गुरूवर्य एम. ए.कुलकर्णींनी मला एक अभिनव शिक्षा ठोठावली. दररोज सकाळी लवकर शाळेला येणे, फळा स्वच्छ पुसणे आणि रोज एक नविन सुविचार फळयावर अग्रभागी लिहीणे. सुरूवाती ला अपमानकारक वाटणारी ती शिक्षा नंतर छंदात रूपांतरीत झाली.

आणि मी अनेक चांगल्या पुस्तकांच्या, सुविचाराच्या संपर्कात आलो.

मास्तरांचामार खाण्याचे दिवस आता संपलेले आहेत. हल्ली मास्तरांना कसे मारता येईल, याचा विचार मुले करायला लागली आहेत. शाळेतून मास्तरांचा मारच गायब झालेने आदरयुक्त भीतीही गायब होऊ लागली आहे. पूर्वीच्या खेडयांमधून वयाची बंधने नसणारी अनेक पाल्ये मार खाऊनच ज्ञान शिकली, मोठी झाली. आज मात्र त्यांना आपल्या मुलांना किंवा नातवांना शिक्षकाने रागावलं तरी अपमानकारक वाटतं, हे वाईट. मास्तरांचा मार खाल्ल्याशिवाय जीवनाला आकार येत नाही. मार खाऊन ज्ञान घेतल्याचा अनेक लोकांमधला मी एक आज मात्र त्या सगळया गोष्टींचे मनःपूर्वक आभार मानतो.

# विद्या देवता श्री गणेश देवतायन:महा

श्री. दिलीप पवार मोबाईल - ९९२२२२४७२३

वीस वर्षांनी देखील मी त्याला पूजणेसाठी जात आहे. त्याचा उजवा हात सैदापूर विठ्ठल मंदिर मध्ये दुखावला होता. लोकांच्या सांगण्यावरून ती मूर्ती विसर्जन केली होती नियतेची लिला अगाध आहे त्याच्या आशिर्वादाची किमया सर्वच्या कामी आली. तेव्हाच मला हाताबद्दल लिहण्याचा श्री गणरायाच्या कृपा आर्शिवादामुळे मोह झाला. इतिहास तसा फार मोठा आहे. काले ता. कराड शिल्पकार पांडुरंग पाटील यांच्या कडून मूर्ती पाडव्याच्या शुभ मुहर्तावर आणली होती सजीवांना ईश्वराने अवयव दिले मानसाला जरा जास्तच दिले सर्व अवयव आपआपल्या तऱ्हेने म्हणण्यापेक्षा गरज आणि कामानं श्रेष्ठच आहेत एकावाचून दुसरा अवयव निकामी तर डावा उजवा हात आहे प्रत्येकाच्या हाताशिवाय काहीच चालत नाही विद्यादेवता श्री गणरायाची ईश्वरी कृपेची कमाल आहे. म्हणूच मला वाटतं कोणालाही प्रथम हात जोडण्याची निसर्ग संस्कार युक्त आपली परंपरागत मानवी पध्दत आहे शुभ कामाच नंतर पण सर्व प्रथम त्या विघ्नहर्ता गणरायाला नकळत हात जोडले जातात. दोन्ही हाताचा नमस्कार माणसाला तर भावतोच पण देवादी देव श्री गणरायालाही पावतो. या भूमीवर जन्म घेतल्यानंतर आपल्याला आपल्या पायावर जरी उभं राहायचं असेल तरी त्याला खरी गरज हाताची आहे एक हात काही कारणामुळे काम करेनासा झाला कि माणसाचे जीवन हात मोडल्यासारखेच होतात मग तोच हात जाय बंदी झाला असेल आणि सगळं डाव्या हाताने लेखन काव्य काम करणेची वेळ आली असेल तर कोण पंचायत म्हणून हात या अवयवाकडे माझ

आध्यात्मयुक्त लक्ष कृतज्ञतेनंच जात तसं इतर अवयवांच स्थानही तेवढंच महत्वाचे आहे बरं का नाहीतर ते अवयव उगाच हात दाखवतील आणि अवलक्षण होईल उदाहरणात हातांची हालचाल काही क्षणात जन्मलेले मुल दुपटयात असतात ना तेव्हापासून होते दोन्ही हाताची आवाज न येणारी टाळि वाजायला सुरवात झाली कि आजूबाजूचे म्हणतात लागल मोरया मोरया करायला मग जे दिसले ते तोंडात ढकलायला हातच पुढे येतात दुध पाजणाऱ्या मातेचा पदर ओढण किंवा केस ओढण हाताची मुठ घट्ट एकहून पुढे हीच मुठ सव्वा लाखाची कि काय या प्रकारात मोडते असले चाले मग हातानं जेवायला सुरवात करणे.

पायाच्या बरोबर दुमडून रांगण विचारू नका खेळण पकडून दुधाचा चमचा फेकून देणे हळूहळू जेवण करायला शिकण हातावर रांगण मोठ्या हातान छोटा हात पकडून ग म भ ण अक्षर गिरवणे स्वत: ची स्वच्छता अंघोळ कपडे धून सगळ सगळ आल. शाळेमध्ये शिक्षकांचे हातावर फटके खाण देवाला हात जोडण टाटा करणे किंवा बाय बाय किंवा या या अशा खुणा करण हाताणच घडतं हातोहात फसवतात आणि गुंडगिरी करून हिसका दाखवायचा असला म्हणजे हात दाखवला असच म्हणतात बुडत्याला वर काढण्यासाठी हातच द्यायला लागतो दानधर्माला किंवा भिक मागायला सुध्दा हातच पुढे येतात या हाताच त्या हाताला कळत अस हि म्हणतात.

## दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

### महादेव कदम
महाइसेवा केंद्र,महागाव,
ता.गडहिंग्लज जि.कोल्हापुर
9689217413

उजळलेल्या असंख्य दिव्यांच्या सवे,
येई दिवाळी बहरूनी अंगणात,
करा नाश द्वेषाच्या अंधकाराचा
प्रेमच प्रेम पसरूदे मना - मनांत....

**श्री महादेव विविध कर्मचारी (वि.का.स.) सेवा संस्था मर्या,कानडेवाडी ता.गडहिंग्लज,जि.कोल्हापूर.**
स्थापना - दि.3/2/1960

वसुल भागभांडवल - 40 लाख
कर्जवाटप 3.25 कोटी ( पीककर्ज , खावटी , किसान सहाय ट्रॅव्हलर ट्रॉली व शेती अवजारे इ.)

**संचालक**

श्री. विलास भाउराव देसाई
श्री. सुभाष लाडोबा देसाई
श्री. जयसिंग आबासो देसाई
वैजू तुकाराम नाईक
श्री. गोविंद कृष्णा शिंदे
श्री. अप्पा भैरू डवरी
श्री. जयसिंग अबासो देसाई
श्री. भिमराव दत्तू देसाई
श्री. नरसु धोंडिबा कांबळे
सौ.प्रभावती पांडूरंग सुर्यवंशी
अश्विनी जगन्नाथ चिंदके

**कर्मचारी वर्ग**

श्री.बाळासाहेब भिमराव देसाई ( सचिव )
श्री.विष्णू परसु कांबळे ( क्लार्क )

**Kiran K. Kurade**





UNIQUE
Computers sales & Services



Computer&Laptop,
Server CCTV, LED,
T.V. Printer,Tally,
Cash Counting Machine,

Naikwade Complex,Near Bus Stand,
Opp. Petrol Pump , Sankeshwar - 591313

## दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

### नारायण देसाई
मु.पो.अर्जुनवाडी
ता.गडहिंग्लज जि.कोल्हापुर

उत्कर्षाची लाट उमटली,
विरला गर्द कालचा काळोख...
क्षितीजावर पहाट उगवली,
घेऊनीया नव उत्साह सोबत...
!! दिवाळीच्या प्रकाशमय शुभेच्छा !!

# दिपावलीच्या
## हार्दिक शुभेच्छा !

**श्री.भगवान पाटील**

मु.पो.कानडेवाडी,ता.गडहिंग्लज,
जि.कोल्हापूर


# दिपावलीच्या
## हार्दिक शुभेच्छा !


## आपल्या व्यवसायाची वेबसाईट बनवा..

माफक दरात




आजचं आपल्या व्यवसायाची वेबसाईट डिजाईन व स्मार्टफोन अॅप अगदी माफक दरात बनवा आणि आपल्या व्यवसायाची अधिकाधिक प्रसिद्धी करा..

**ज्ञानग्रुप**

पत्ता - कुपेकर हॉस्पिटल, भडगाव रोड
गडहिंग्लज कोल्हापूर

**9623615061**




## महाहेल्थ अॅप

आत्ता आरोग्यविषयक मराठीतून माहिती मिळवा आपल्या स्मार्टफोनवर अगदी मोफत..!

आजचं डाउनलोड करा महाहेल्थ अॅप गुगल प्लेमधून.

GET IT ON Google Play

# दिपावलीच्या
## हार्दिक शुभेच्छा

# सर्वांना दिपावलीच्या
## हार्दिक शुभेच्छा......



**श्री.अजित नारायणराव देसाई**



**श्री.सागर नारायणराव देसाई**

माजी संचालक - गोड साखर गड

**देसाई परिवार व मित्र परिवार,महागांव**

# एक कदम स्वच्छता से प्लॅस्टीक मुक्ती की ओर

अमर देसाई मोबाईल नं:९७६५८२६४३३

सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत एक गोष्ट आपल्या बरोबर नि:शब्दपणे वावरत असते. सणासुदीचे दिवस असो वा मुलांच्या शाळेची गडबड, भाजीला जायचे असो वा हॉटेलमधून पार्सल आणायचे असो, फ्रीजमध्ये भाज्या ठेवायच्या असो वा पिकनिकला जायचे असो, प्रसंग काहीही असो, वाढदिवस, समारंभ, गणपती, दिवाळी एक वस्तू आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग झाली आहे.'प्लॅस्टीक' प्लॅस्टीकचा शोध १९ व्या शतकाच्या सुरुवातीला न्यूयॉर्क मध्ये लागला आणि काही दशकांम ध्येच प्लॅस्टीकचा वापर आपल्या दैनंदिन व्यवहारात होऊ लागला आणि आता तर प्लॅस्टीक आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग झालंय.पण ह्या प्लॅस्टिकचे जसे उपयोग आहेत त्यापेक्षा शतपटीने त्याचे अनेक गंभीर दुष्परिणाम आज सायन्सच्या आणि त्यामुळे सर्वसामान्यांच्या लक्षात आले आहेत.आजघडीस प्लॅस्टीकचा वापर इतक्या मोठ्या प्रमाणात आणि वारंवार होतो आहे की त्यामुळे पर्यावरणाचा समतोल पूर्णपणे बिघडला आहे. आणि याचे अतोनात गंभीर परिणाम प्राणी आणि मनुष्या च्या आऱोग्यावर दिसून आले आहेत.जितक्या सहजतेने प्लॅस्टिकने त्याचे जाळे पसरवले तितकेच कठीण होऊन बसले आहे त्याचे अस्तित्व मिटवणे आणि कमी करणे अशक्य प्राय झाले आहे. आज अनेक देशांनी प्लॅस्टिकवर काही अशी बंदी आणली आहे. प्लॅस्टिकची गुणवत्ता ठरवून फक्त त्याच गुणवत्तेचे प्लॅस्टीक वापरण्याचे कायदेही निघालेत.

प्लॅस्टीक अगदी माती, पाणी, हवा यांच्यातून थेट आपल्या रक्तात जाऊन मिसळले आहे. शहरे, महानगरे व संपूर्ण ग्रामीण एकाच ध्येयाने

स्वच्छतेकडे वळत आहे .मोठ - मोठे सेलेब्रेटी हातात झाडू घेऊन स्वच्छता करत आहेत . हि स्वच्छतेची चळवळ यशस्वी करण्यासाठी सर्वजण धडपडत आहेत . प्रशासन जनता अधिकारी आणि सेलेब्रिटी एकत्र एकाच ध्येयाने स्वच्छतेच्या मोहिमेत सामील होत आहेत . प्रशासनाने मनावर घेतले तर कर्तबगार अधिकारी काय करू शकतात ह्याचे उत्तम उदाहरण म्हणजे नाशिक शहर . संपूर्ण गोदावरी नदीचे पात्र लोकचळवळीतून स्वच्छ झाले आहे.गेल्या शतकात गाडगेबाबा , महात्मा गांधी हे स्वच्छतेचे दूत होते हे इतिहासातुन दिसून आले आहे.

ह्या संपूर्ण चळवळीचा मुख्य उद्धेश जरी एकच असला तरी प्लॅस्टीक मुक्ती प्रशासन १००% यशस्वी करू शकले नाही. हेही त्रिवार सत्य आहे . हि आपली शोकांतिका म्हणावी काय? संपूर्ण जगाला प्लॅस्टीक'मुक्ती चा प्रश्न भेडसावत आहे .शहरांच्या आजूबाजूचा ग्रामीण भाग आता ह्या कचऱ्याला विरोध करू लागलाय ग्रामपंचायती ,नगरपालिका , महानगरपालिका वेगवेगळे उपाय योजना करून कचऱ्यापासून शहरे,गावे , मुक्त करू पहात आहेत .पर्यटन स्थळे याला अपवाद कशी ठरतील ? आपले ऐतिहासिक ठेवा असणारे किल्ले , आपल्या देव - देवींची मंदिरे , आपल्या निसर्गाचा ठेवा असणारे तलाव ,धबधबे ,समुद्र किनारे यांच्या परिसरात प्लॅस्टीक कचऱ्याचा प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे.काही पर्यटन स्थळाजवळील हॉटेल ,रिसॉर्ट संघटना आपली सामाजिक संघटना , शैक्षणिक संस्था ,युवकांचे ग्रुप , अशा पर्यटन ठिकाणावर जाऊन स्वच्छता मोहीम राबवीत आहेत .हि ह्या चळवळी ची सकारात्मक बाजू असली तरी हि व्यवस्था ह्या मोहिमेसाठी अपुरी आहे .कचऱ्याचे विविध प्रकार आहेत . प्लॅस्टीक' कचरा वैधकीय कचरा

ई कचरा.शासनाने प्लास्टिक पिशव्यांवर बंदी घालण्याचे आदेश दिले असले तरी या आदेशाची सर्वत्र सर्रास पायमल्ली सुरू असून प्लास्टिकच्या अतिरेकी वापराने प्रदूषणात दिवसेंदिवस भयंकर वाढ होत आहे. अनेक नाले-गटारांमध्ये प्लॅस्टीक अडकून पडल्याने पावसाळ्यात सांड पाणी तुंबते आणि साचते. तसेच अनेकदा प्लॅस्टीकमधून शिळे खाद्य पदार्थ फेकण्यात येत असल्याने हे प्लॅस्टीक खाऊन गाय, म्हैशीसारखी अनेक जनावरे सर्रास मृत्युमुखी पडत आहेत.

प्लॅस्टीकला पर्याय काय ? जगभरचे शास्त्रज्ञ ह्यावर संशोधन करत आहेत . ह्या कचऱ्याला नष्ट करण्यासाठी उपाय शोधताहेत पण आजूनही यावर ठोस पर्याय पुढे आलेला नाही . या गंभीर प्रश्नावर आपण प्रत्येकाने विचार करायला हवा. ही समस्या आपली एकट्याची नसून संपूर्ण मानव व सजीवांची आहे . प्लॅस्टिक बंदी प्रशासन अजूनही यशस्वी करू शकले नाही. आपण प्लॅस्टीक कमीत कमी वापरल्यास आपण ह्यावर मात करू शकतो .

हल्ली एक-दोन दिवस सुट्टी आली तर विचारूच नका. तरुण मंडळी पर्यटनाच्या नावाखाली धागडधिंगा, मद्यपान, गाणे बजावणे करतात. इतरांना त्रास होईल हे त्यांच्या ध्यानीमनी नसते. खाणेपिणे झाल्यावर त्याचा कचरा उचलून कचरापेटीत टाकला जात नाही.

हे सगळं बदलायला हवं. त्यासाठी सार्वजनिक ठिकाणी कचरा करू नये अशी शिकवण घरापासून सुरुवात केली पाहिजे. लहान मुलांना जेव्हा चॉकलेट, कँडी, बिस्किटे खाल्यावर त्यांचे रॅपर्स घरातील कचरा डब्यात टाकावे हे कटाक्षाने शिकवावे. आपणाकडे नागरी भान मुळातच नाही, ते लहानपणापासूनच दिले तर हीच मुले इतरांना त्याची शिकवण देतील.

पर्यटनस्थळे, देवालये व इतर पर्यटन ठिकाणी स्वतंत्र पोलीस चौकी असणे गरजेचे बनत आहे. त्यामुळे पोलीस चौकीत तक्रारीच्या जागेबाबत  र्कायवाही करणे सोपे जाईल.हे बदलण्यासाठी भाविकांनी, पर्यटकांनी कचरा करू नये, याकरिता जागोजागी कचराकुंडय़ा ठेवण्यात याव्यात. सर्वत्र सूचनांचे फलक, हिंदी, इंग्रजी व मराठी भाषेत लावावेत व त्यावर संबंधित यंत्रणेची देखरेख असावी. त्या सूचनांचे पालन होते का हेही पाहणे महत्त्वाचे आहे, आवश्यक आहे.

प्लास्टिक हे नाशवंत नाही. त्याचे विघटन होत नाही याची महिति अनेकांना नसते. त्यामुळे ते माहीत करून देणे आवश्यक वाटते. प्लास्टिकच्या अर्निबध वापरामुळे पर्यावरण, प्राणिमात्र, समुद्रजीव यांची बेसुमार हानी होत आहे. म्हणून प्लास्टिकच्या अर्निबंध वापरावर अंकुश ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. प्लास्टिकच्या पिशवीतून सामान घेणाऱ्यांबरोबरच देणाऱ्यांसाठी जबर दंड हवा. तसेच प्लास्टिक उत्पादनावर बंदी घालावयास हवी. कमी मायक्रॉनच्या पिशव्यांवर तर बंदी हवीच. याकरिता कठोर कायदा करण्याची जरुरी आहे. आपल्याकडे सक्ती केल्याशिवाय कोणतीही गोष्ट साध्य होत नाही. याकरिता आपली मानसिकता बदलणेही आवश्यक आहे.

डॉ. सतीश उपळकर,आजरा 8805442769

## सरसेनापती प्रतापराव गुर्जर स्मारक

कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज तालुक्यातील 'नेसरी' हे गाव मराठी माणसाच्या मनात पराक्रमाचे स्फुल्लिंग चेतवणारे गाव आहे. येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे सरसेनापती 'प्रतापराव गुर्जर' यांची समाधी आहे. गडहिंग्लजच्या सुप्रसिध्द सामानगडापासून सुमारे 20 कि.मी. अंतरावर महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाच्या परंपरेचे मानकरी, स्वराज्याचे सरसेनापती प्रतापराव गुर्जर यांच्या बलिदानाने पवित्र झालेले धारातीर्थ आणि त्या पावन भूमीवर प्रतापराव गुर्जर यांच्या शौर्याची साक्ष देणारे स्मारक उभे आहे. इ.स. 1674 मध्ये आदिलशाही सरदार बेहलोल खानाच्या 20 हजारांच्या फौजेवर अवघ्या सहा स्वारानिशी मराठय़ांचे खुद्द सरसेनापती वेडय़ासारखे तुटून पडले. इतिहासातील एक अत्यंत विषम युध्द या परिसरात घडले. याच बेहलोल खानाला युध्दात हरवल्यानंतर सोडून दिल्याबद्दल छत्रपतींनी सेनापतींना खरमरीत पत्र लिहिले.



गनिमास गर्दीस मिळविल्याखेरीज आम्हास रायगडावर तोंड दाखवू नका' असे त्या पत्रात लिहिले होते.हे पत्र सरसेनापतींना मिळाले तेव्हा ते सहा स्वारांनिशी टेहळणीवर होते. आपली चूक कळून आल्यानंतर प्रतापराव केवळ सहा सरदारांसह, बहलोलखानाच्या सैन्यावर त्वेषाने चालून गेले. हे लढाई नेसरी गावातील खिंडीत झाली.

बेभान होवून सहा स्वारानिशी प्रतापरावांनी खानाच्या हजारोंच्या सैन्यावर चाल केली व हौतात्म्य पत्करले. धन्य ते वीर, धन्य त्यांची ती स्वामीनिष्ठा, असे छत्रपतींच्या शब्दाखातर जीव ओवाळून टाकणारे वीर होते म्हणूनच स्वराज्य उभे राहिले. सात ढाली व सात तलवारी यांच्या प्रतिकृती वापरून बांधलेले हे प्रेरणादायी स्मारक आहे.'म्यानातून उसळे तलवारीची पात, वेडात मराठे वीर दौडले सात.या कुसुमाग्रजांच्या वीररसातील कवितेचा प्रत्यय घेत प्रत्येक शिवप्रेमींनी आवर्जून पाहावे.

**वेडात मराठी वीर दौडले सात...**

आठवा तो इतिहास, जागवा तो पराक्रम, स्वराज्यासाठी वीरांनी केलेल्या अंगावर शहारे आणणारे पराक्रम करून आपणास स्वातंत्र मिळ वून दिले. त्यांचा या पराक्रमामुळेच आज आपण गुण्यागोविंदाने जगत आहोत. अशा या विरांना अभिवादन करायला हवेच. तो इतिहास जाग ठेवण्यासाठी अनेक इतिहासप्रेमी पर्यटक अशा स्थळांना भेटी देतात. तो इतिहास जाणून घेतात. नेसरी येथे प्रतापराव गुर्जर यांची स्मारक आहे या स्मारकांला अनेकजण भेट देतात.

**किल्ले सामानगड**

किल्ले सामानगड हा शिवकालीन किल्ला आहे. 12 व्या शतकात राजा दुसरा भोज यांनी हा किल्ला बांधला. भोज राजवटीच्या अस्तानंत र हा किल्ला आदिलशहाकडे गेला. 12.34 हेक्टर क्षेत्रफळातील अंडाकृती आकाराच्या डोंगरावर हा किल्ला आहे. 1667 मध्ये छ. शिवाजी महारा जांनी तो आदिलशहाकडून जिंकून घेतला. त्यानंतर 1676 मध्ये शिवरा यांनी किल्ल्याची डागडुजी केली. याठिकाणी सैन्याची रसद, शस्त्रे व दारुगोळा ठेवला जात असे. सर्वांत लहान, परंतु मजबूत किल्ला म्हणून

या किल्ल्याची ओळख होती.1844 मध्ये करवीर संस्थानचे मंत्री दाजी पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली सामानगडाच्या गडकऱ्यांनी ब्रिटिशांविरुद्ध बंड केले होते. बंडात या गडाचा गडकरी मुंजाजी कदम शहीद झाला. जनरल डिलामोटे यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटिशांनी हा किल्ला काबीज केला व किल्ल्याची नासधूस केली. त्यानंतर सामानगडावरील मामलेदार कचेरी गडहिंग्लज गावी हलविण्यात आली.छत्रपती शिवाजी महाराज व समर्थ रामदास यांनी या किल्ल्याला भेट देऊन काही काळ वास्तव्य केल्याची नोंद आहे. प्रसंगवशात समर्थांनी शिवरायांच्या समक्ष पाषाण फोडून जिवंत बेडकी काढल्याची घटना याच किल्ल्यातील असल्याचे वर्णन समर्थ चरित्रात आढळते.कोल्हापूरपासून 80 कि.मी. अंतरावर आग्नेय कोपऱ्यात सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर समुद्र सपाटीपासून 2972 फूट उंचीवर हा किल्ला आहे. किल्ल्यास भक्कम तटबंदी असून टेहळणी साठी प्रवेश बुरूज, झेंडा बुरूज, वेताळ बुरूज, शेंडा बुरूज असे लहान मोठे दहा बुरूज आहेत.2006 मध्ये स्व. बाबासाहेब कुपेकर यांच्या प्रयत्नाने सामानगडाचा 'क' वर्ग पर्यटनस्थळामध्ये समावेश झाला आणि किल्ल्याच्या विकासासाठी एक कोटी 33 लाखांचा निधी मिळाला. त्यातून किल्ल्यावर यात्री निवास, उपहारगृह, विहिरींना संरक्षक कठडे, बगीचा, अंतर्गत रस्ते, डॉरमेटरी, धर्मशाळा, बालोद्यान व सांस्कृतिक सभागृह, इत्यादी कामे झाली. स्व. डॉ. ए. डी. शिंदे यांनी किल्ल्यावरील हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार केला.दरवर्षी महाशिवरात्रीला गडावरील हनुमान देवाची यात्रा भरते. पंचक्रोशीतील सात पालख्यांची यात्रेत भेट होते. इतिहास संशोधक व अभ्यासकांसह पर्यटक व भाविक गडाला भेट देतात. याशिवाय शाळा-महाविद्यालयांच्या सहली येतात. मात्र, पर्यटना च्या दृष्टिकोनातून प्रसिद्धीपासून हा किल्ला अजून दूरच आहे.

**ऐतिहासिक महत्त्व :**

छ. शिवाजी महाराज व रामदास स्वामी यांच्या या किल्ल्यावरील वास्तव्याची इतिहासात नोंद.संकेश्वरनजीकच्या निडसोशी मठाचे संस्थापक आद्‌य शिवलिंगेश्वर महास्वामीजी यांचा जन्म या ठिकाणीच झाल्याची नोंद आहे.स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताकदिनी 21 बाय 14 आकारातील तिरंगा ध्वज या किल्ल्यावरील झेंडा बुरुजावर शासनातर्फे फडकविला जातो. मंत्रालयानंतर इतक्या मोठ्या आकारातील तिरंगा केवळ याच गडावर फडकविला जातो.

**काय पहाल..?**

रामदासकालीन हनुमान मंदिर, भवानीमाता मंदिर, भुयारी शिवमंदिर, सूर्य मंदिर, चाळोबा मंदिर, भीमशाप्पा मठ, अंधार कोठडी, प्राचीन गुहा, चोरखिंड व सात कमान विहीर, रामखडी (सूर्यास्त दर्शन पॉईंट), गायमुख तीर्थ, शाळीग्राम.

**चंदगड**



महाराष्ट्र - कर्नाटक व गोवा राज्याच्या सीमेवर वसलेला चंदगड तालुका म्हणजे जणू पृथ्वीवर स्वर्गच अवतरलेला भास होतो. निसर्गसंपन्न डोंगररांगातील गर्द वनराई, त्यातून विसावलेली गावे, हिरवीकंच शिवार, कोसळणारे धबधबे, फेसाळत वाहणारे झरे, मनाला मोहविणारे जलाशय, विविध प्रकारचे वृक्ष, दुर्मिळ पक्षी व प्राण्यांच्या अधिवासाने समृद्ध जंगले, पाऊस आणि धुक्याची जादु येथे एकाचवेळी पाहायला मिळते.

धो-धो पावसात चंदगड येथील संपूर्ण डोंगरमाथ्यावरील हिरवळ, अविरत कोसळणारे शुभ्रधवल पाणी पाहणाऱ्यांना निसर्ग पांढऱ्या रंगाची किनार असलेला हिरवा शालू परिधान करून जणू काही आपल्या स्वागताला उभा आहे की काय असा वाटतो.

**चंदगडी संस्कृती :**

कोकणी, कर्नाटकी आणि गोवन भाषेचे वेगवेगळे सूर आणि विविध जाती-धर्माचा अनोखा मिलाफ ही चंदगड तालुक्याची वैशिष्ट्ये सांगता येथील. गोवा, कोकण आणि कर्नाटकच्या सीमेवर विसावलेल्या या तालुक्यात त्या त्या राज्यातील संस्कृतीचा प्रभाव जाणवतो. पारगड, तिलारीनगर, हेरे परिसरात कोकणी भाषा आणि संस्कृतीचा प्रभाव आहे. विविध सन उत्सव, धार्मिक कार्यक्रमात याचा प्रत्यय येतो. विशेषतः वार्षिक यात्रोत्सव व त्यानिमित्त होणाऱ्या सांस्कृतीक कार्यक्रमात दशावतारी नाटकाचा समावेश असतो होळी सनाला पंधरा दिवस सोंगे काढण्याची प्रथा इथे आजही पाहायला मिळते.

**चंदगडी भाषा :**

वाक्यातील ठराविक शब्दाना 'स' आणि 'इस' प्रत्यय लावून बोलली जाणरी भाषा खास चंदगडी म्हणून प्रसिद्ध आहे. या चंदगडी भाषेला एक वेगळे स्थान मिळाले आहे. आमच्या पश्चिम भागात कोकणी, तर पुर्व भागात काहीसा कन्नड सूर लावुन बोलली जाणरी भाषा लक्ष वेधून घेते.

**चंदगड म्हणजे 'निसर्गाची खाण'..!**

चंदगड म्हणजे 'निसर्गाची खाण' अशा या निसर्ग सृष्टीचा हेवा प्रत्येकालाच वाटतो आणि वाटावा असे आपले हे चंदगड आहे. काही दिवसापूर्वी आपल्या तिलारीच्या आसपास व्याघ्र दर्शन, कन्नडी हत्तींचे तालुक्यात

वरच्यावर असलेले आगमन सुंदर निसर्गसृष्टीची ग्वाही देते. निसर्ग जेवढा इथे वर्षाव झाला तेवढेच जंगली प्राणीही इथे पहावयास भेटतात. निसर्गवेड्या पर्यटकांना पारगड, स्वप्नवेल पॉईंटस्, रावतोबा पॉईंटस्, ग्रीन व्हॅली रिसॉर्ट, सर्च पॉईंटस्, मोर्लेचा दुर्गोबा धबधबा आणि तिलारीचा तुडुंब भरलेला जलविद्युत प्रकल्प पर्यटकांना भुरळ घालतो.

**स्वप्नवेल पॉईंटस् तिलारी :**

तिलारीनगरनजीक असलेला स्वप्नवेल पॉईंटस् म्हणजे प्रती महाबळेश्वरच आहे. तिलारीनगरमधून डाव्या बाजुला तुडियेच्या दिशेने जाणार्या मार्गावरील हा पॉईंट महाबळेश्वरच्या निसर्गाची आठवण करून देते. विस्तिर्ण दरी, एकापाठोपाठ दिसणारे सात डोंगररांगा आणि सुमारे तीनशे फुटांवरून खोल दरीत कोसळणारे धबधबे पाहताना निसर्गाच्या चमत्काराची प्रचीती येते. पावसाळ्यात हा संपूर्ण भाग धुक्याने झाकलेलाच असतो.

**रावतोबा :**

तिलारीनगरपासून पुढे घाटाच्या दिशेने प्रवास करताना कोदाळी गावानजीक डाव्या बाजुला एक पायवाट जाते तिथून काहीसे पुढे गेले की विस्तिर्ण जलाशय आपले लक्ष वेधतो तिलारी जलविद्युत प्रकल्पाचे बॅक वॉटर पाहावयास मिळते.

**पॉप्युलर धबधबा :**

तिलारीनगर गावाला लागुनच असलेला हा धबधबा बारमाही कोसळतो.

**तिलारी धरण :**

तिलारी नदी सुमारे 650 मीटर उंचीवरून खाली कोकणात उतरून गोव्यामध्ये अरबी समुद्राला मिळते. या नैसर्गिक उंचीचा फायदा घेऊन

त्यापासून वीजनिर्मिती करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने तिलारी प्रकल्प साकारला. त्यानुसार तिलारी नदीवर धामणे गावानजीक दाट जंगलात 38.05 मीटर उंचीचे दगडी धरण बांधण्यात आले. हे धरण वास्तुशास्त्रा चा अद्‌भुत नमुना आहे. चहुबाजूंनी घनदाट जंगलाने व्यापलेले विस्तीर्ण जलाशय पाहताना मन प्रसन्न होते.

**पारगड :**

गोवा आणि सिंधुदुर्ग जिल्हाच्या सीमेवरील पारगड किल्ला छत्रपती शिवरायाच्या पदस्पर्शाने पुनीत झालेला असून त्याची उंची समुद्रसपाटी पासुन 747 मीटर आहे. गडावर चढुन जाण्यासाठी 250-290 पायऱ्या आहेत. गडावरील शिवकालीन भवानी मातेचे मंदिर, हनुमान मंदिर पाहण्यासारखे आहे. येथील भवानी मातेची मुर्ती प्रतापगडावरील भवानी मातेच्या मुर्तीशी साधर्म्य दर्शवणारी आहे. उन्हाळात रात्रीच्यावेळी गडावरून लुकलुकणारा गोवा पाहणे एक वेगळा अनुभव येथे मिळतो. पारगडच्या पायथ्यापासून नागमोडी वळणे घेत जाताना जंगली प्राणी, निरनिराळे खेकडे, देवाच्या गायी, थुई-थुई नाचणारे मोर, हत्ती, रानडु करे व निरनिराळे पक्षी व प्राण्यांचे दर्शन होते. चुकून एखादेवेळी झालेले सूर्यदर्शन, मध्येच येणारे धुके मनाला अल्हाददायक वाटते. येथून दिसणारा गोव्याचा अथांग महासागर डोळ्यांचे पारणे फेडतो. पारगडबरोबरच तालुक्यातील कलानंदीगड, गंधर्वगड, महिपाळगड, आदी गड पाहिल्यानंतर शिवकालीन इतिहासाची आठवण होते.

**महिपाळगड :**

कर्नाटकच्या सीमेवर बेळगावपासुन अवघ्या 20 किलोमीटरवर हा गड

असून येथील पुरातन वैजनाथ मंदिर पाहण्यासारखे आहे. दरवर्षी महा शिवरात्रीला मोठी यात्रा भरते. विविध औषधी वनस्पतींनी सिद्ध असा हा परिसर आहे. गडावरून संपुर्ण बेळगाव शहराचे दर्शन होते तर अनेक कन्नड आणि दाक्षिणात्य चित्रपटांचे चित्रीकरण येथे झाले आहे.

**कलानंदिगड :**

पारगड आणि महिपाळगडाच्या मध्यवर्ती असलेला हा अत्यंत दुर्गम गड असून गडाच्या पायथ्याशी धनगर समाजाची वस्ती वसली आहे. आजही गडाची तटबंदी आणि जुने बांधकाम सुस्थितीत आहे.

**गंधर्वगड :**

चंदगड - गडहिंग्लज मार्गावर वाळकुळी गावाला लागुन गड असून हे-याच्या संस्थानिक सावंत भोसले यांचे या गडावर वर्चस्व होते. गडावरून चंदगड तालुक्याच्या दक्षिण- उत्तर भागाचे सहज दर्शन घडते.

**इसापुरचा धबधबा :**

पारगड किल्ल्याच्या पायथ्याशी इसापुर गावातुन दिसणारे कुक्कुडदा धबधबा डोळ्याचे पारणे फेडतो. गावातील 'गुजगी' च्या माळावरून दूरवरील कड्यावरून कोसळणारे धबधबे पाहत राहावेत असे आहेत.

**वज्राचा धबधबा :**

महिपाळगडाच्या पायथ्याशी उंचीवरून कोसळणारा हा धबधबा सीमाभागातील पर्यटकाचे आकर्षण आहे. पावसाळ्यात सुरू होऊन धबधबा नोव्हेंबर पर्यंत सुरू राहतो. श्रावण महीन्यात येथील निसर्ग अधिकच खुलतो.

**रवळनाथ मंदिर :**

चंदगड गावाचं श्री देव रवळनाथ हे ग्रामदैवत आणि तीर्थपीठ. 84 खेड्याचे ग्रामदैवत असलेल्या या देवाचे भक्त गोवा, कोकण आणि कर्नाटकात लाखोच्या संख्येने आहेत. दरवर्षी वार्षिक यात्रोत्सवाला त्यांची

हजेरी असते. यावेळी होणारी पालखी मिरवणुक आणि डोक्यावरील आरती विशेष आकर्षण असते. सलग बारा वर्ष लोकवर्गणीतुन साकरले गेलेले हे मंदिर प्राचीन आणि आधुनिक शिल्पकलेचा एक उत्तम नमुना म्हणून गणले जाते.

**सापांबद्दल जाणूया...ढोलगरवाडीत :**

चंदगड तालुक्यातील ढोलगरवाडी येथे दरवर्षी नागपंचमीला सर्व जातीं च्या सापांचे प्रदर्शन भरते त्यामध्ये सापांची सविस्तर माहिती आणि त्याचे फायदे सांगितले जातात. हे प्रदर्शन 1966 पासून कार्यरत आहे. सर्प प्रदर्शनात नाग, मण्यार, घोणस, फुरसे, चापडी या विषारी जाती च्या सापाबरोबर अजगर, धामण, वेरूळा, सर्पटोळी, नानेट, तस्कर आदी बिनविषारी जातीचे साप पहावयास मिळणार आहेत. सर्प प्रदर्शना ला सेंट्रल झु ऍथॉरिटी दिल्ली व वन्यजीव संरक्षण विभाग महाराष्ट्र राज्य नागपूर यांनी मान्यता दिली आहे.. ढोलगरवाढीची नागपंचमी देशात प्रसिद्ध असून दरवर्षी नागपंचमीला येथे मोठी यात्रा भरते.

**आजरा**

**रामतीर्थ :**



रामतीर्थ कोल्हापूर जिल्हा तील आजऱ्यापासून तीन किलोमीटर अंतरावर हिरव्या गर्द वनराईच्या कुशीत वसलेला रामतीर्थ धबधबा पावसात मुसळधार कोसळू लागतो. आजरा शहराच्या पश्चिम-उत्तर पूर्व दिशेकडून हिरण्यकेशी नदी वाहते. या नदीवरील रामतीर्थ

धार्मिकस्थळाजवळचा धबधबा म्हणजे निसर्गसौंदर्याचा खजिना.आजरा तालुक्यामध्ये असलेले रामतीर्थ हे पावसाळी पर्यटनाच्या दृष्टीने एक उत्तम ठिकाण आहे. तीर्थक्षेत्र असूनही या ठिकाणाला नैसर्गिक संपन्नता लाभली आहे.या परिसरात जुनी, ऐतिहासिक मंदिरे आहेत.

दरवर्षी हजारो पर्यटक या स्थळाला आवर्जून भेट देतात. पावसामुळं हिरण्यकेशी नदीचं पात्र वाहायला सुरुवात झाली की, उन्हाळ्यात कोरडा पडलेला धबधबा सौंदर्यानं खुलत जातो. निसर्गाचं मुक्तहस्ते वरदान लाभलेला हा धबधबा अनेकांना भुरळ घालतो. नदीपात्रातील काळ्याक भिन्न विशाल दगडावरून वेगानं धावणारं पांढरं-तांबूस पाणी धबधब्याचं सौंदर्य खुलवितं. तसंच कोसळणाऱ्या प्रपाताचे तुषार आणि मांद्रसप्तका तील धीरगंभीर आवाज अवघा आसमंत भरून टाकतो.रामतीर्थ जसे पर्यटन स्थळ आहे तसे ते धार्मिक स्थळ सुद्धा आहे. या ठिकाणी शंकराचे पुरातन असे मंदिर असून या ठिकाणी महाशिवरात्री रोजी मोठी यात्रा भरते. प्रवेशमंडपात घोटीव देखण्या नंदीची मूर्ती असून तिच्या समोरील बाजूस एक नागफणी कोरलेली आपणास दिसते. नंदीची उंची साधारत: ६.५ फूट असावी. नंदीवरील कोरलेला साजशृंगार रसिक मना ला मोहवितो. काळ्या पाषाणातील हा नंदी इतर मंदिरातील नंदी पेक्षा थोडा वेगळा आहे. त्याचे भव्य रूप पाहून आपण आचंबित होतो.

रामतीर्थ या ठिकाणी प्रभू रामचंद्र वनवासात असताना एक रात्र राहिले होते अशी स्थानिक रहिवाश्यांची समजूत आहे. हे ठिकाण हिरण्यकेशी नदीच्या तीरावर असून या ठिकाणी प्रभू श्रीरामाचे मंदिर आहे. हे स्थळ आजरा, गडहिंग्लज, चंदगड, गारगोटी तालुक्यातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे.अशा या निसर्गरमणीय व देखण्या स्थळाचा

उपयोग अनेक चित्रपटनिर्मात्यांनीही करुन घेतला आहे. या ठिकाणी राम राम गंगाराम, बोट लावीन तिथ गुदगुल्या व जोगवा या सारख्या चित्रपटांचे चित्रीकरण झाले आहे. राज्य परीवहन मंडळाच्या कोल्हापूर -आजरा पर्यंत थेट बस उपलब्ध आहेत. आजरा येथे राहण्यासाठी हॉटेल्स उपलब्ध आहेत. अशा या हिरव्यागार वनराईच्या कुशीत वसलेला रामतीर्थ धबधब्याचे सृष्टीसौंदर्य सर्वांनी पाहावे असेच आहे.

# DnyanGroup

(share, care, dare.)

## DnyanRajya Technologies Pvt. Ltd.



- Website Development
- Village /Grampanchayat Website App's
- App's Development
- News Portals
- Web based Software Development
- Local directories
- Personal Blog Creation & Support
- Innovational & Creative Work
- Youtube Channel Creation





## Website Features Done

- SEO(Search Engine Optimization)
- Google Ranking
- Enquiry Forms
- Visitors/Analytics
- Portfolio Online/ ResumeWriting
- SMS Marketing
- Digital Marketing
- Admin Panel Support
- Google Maps

+91 9623615061

+91 9552912142

Address : DnyanGroup, Kupekar Hospital, Bhadgaon Road, Gadhinglaj Dist. Kolhapur

Email : dnyangroup@gmail.com Website : www.dnyangroup.com

सेनापती प्रतापराव गुजर शिक्षण संस्था संचलित , कानडेवाडी , ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

# राजा शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय, महागांव, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

फोन नं (02327)275124 E-mail - principal.rsccollege@gmail.com




संस्थापक

## महाविद्यालयाची ठळक वैशिष्टये

- समृध्द ग्रंथालय व अभ्यासिका
- अनुभवी , निष्णात व संशोधक प्राध्यापक वर्ग
- ज्युनिअर व सिनिअर विभागाकडे स्वतंत्र राष्ट्रीय सेवा योजना विभाग ( N.S.S.)
- क्रिडा, कला, वक्तृत्व लेखन, अभिनय यासाठी तज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन
- विद्यार्थीनींना स्वतंत्र विश्राम कक्षेची सोय.
- विद्यार्थ्यांच्या संपुर्ण व्यक्तिमत्व विकासासाठी वर्षभर विविध सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन.
- महाराष्ट्र शासन व विद्यापीठ मान्यताप्राप्त विविध व्यावसायिक अभ्यासक्रम व विविध शिष्यवृत्यांची सोय.
- प्राथमिक , माध्यमिक , उच्च माध्यमिक , आजी व माजी जवानांच्या मुलांना फी सवलत
- उत्कृष्ट निकालांची उज्वल परंपरा

प्राचार्य
डॉ.निवास जाधव

अध्यक्ष
बाळासाहेब कुपेकर

म्हैसाळ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय , म्हैसाळ, ता.मिरज, जि.सांगली.

राजर्षी शाहू हायस्कूल कानडेवाडी , ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

सेनापती प्रतापराव गुजर शिक्षण संस्था कानडेवाडी संचलित

# म्हैसाळ कला वाणिज्य आणि विज्ञान महाविधालय , म्हैसाळ. ता.मिरज, जि.सांगली

संस्थापक : स्वर्गीय नामदार बाबासाहेब कुपेकरसाो
( माजी विधानसभा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य)
सचिव:मा.यशोमतीदेवी बाळासाहेब कुपेकर



अध्यक्ष : मा.बाळासाहेब कुपेकरसाो
( माजी कोषाध्यक्ष पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती)
प्रभारी प्राचार्य : डॉ.नामदेव रघुनाथ गवळी

## प्राध्यापक वृंद

- मराठी विभाग - प्रा.प्रशांत राजाराम सपकाळ
- हिंदी विभाग - प्रा.रीना सुरेश पाटील , प्रा.जयश्री प्रकाश पाटील
- इंग्रजी विभाग - प्रा.रूपाली अनिल परीट
- समाजशास्त्र विभाग - प्रा.सुजाता तुकाराम पाटील
- अर्थशास्त्र विभाग - प्रा.गीता संजय शेटे, प्रा.राणी महादेव कांबळे
- मानसशास्त्र विभाग - प्रा.कविता महादेव शेजवळकर
- इतिहास विभाग - प्रा.शुभांगी सदाशिव माने, प्रा.भगवंत सदाशिव लोहार
- राज्यशास्त्र विभाग - प्रा.चैतन्य शंकर कांबळे
- वाणिज्य विभाग - प्रा.मारूती शंकर सपकाळ, प्रा. मुमताज बाबासाहेब मुजावर
- शारिरीक शिक्षण संचालक - डॉ.प्रिया प्रकाश टेले

## प्रशासकिय कर्मचारी वृंद

श्री.रामदास वैजू पाटील- लिपिक
श्री.नवाजशरीफ रियाज भिलवडे- लिपिक
सौ.छाया चंद्रकांत विडकर- ग्रंथालय परिचर
श्री.सचिन आदिनाथ कांबळे - ग्रंथालय परिचर
श्री.रविंद्र रावसाहेब चौगले - शिपाई
श्री.लक्ष्मण शंकर कांबळे - शिपाई
श्री.यल्लप्पा रामू नाईक - शिपाई

# समाज परिवर्तनासाठी युवकांच्या समोरील आदर्श आणि आव्हाने

प्राचार्य- डॉ. निवास जाधव, राजा शिववछत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय,महागांव.

थॉमस हक्सलेच्या मते "मला एक असा तरुण मिळवून दया की जो शरीराने तंदुरुस्त आहे. त्यांची इच्छा व विकार त्याच्या ताब्यात आहेत. त्याचे मन आरशासारखे पारदर्शक व स्वच्छ आहे. तर अशा जगात मी कोणताही चमत्कार दाखवू शकतो". आजच्या जगाला विकसित करणारा एकमेव सक्षम घटक म्हणून तरुणाईकडे पाहिले जाते. सामाजिक उलथा पालथीची जबाबदारी असलेल्या या तरुणांपुढे काय आदर्श व आव्हाने आहेत?असा एकादा प्रश्न एखादया वयस्कर माणसाला विचारला तर त्याचे उत्तर कदाचित असे मिळू शकेल की, आजच्या तरुणांना आदर्श सहन होत नाहीत आणि आव्हाने स्वीकारता येत नाहीत. परंतु खरीच अशी परिस्थिती आहे का? आजची तरुण पिढी ही उद्याची मार्गदर्शक पिढी असेल.त्यामुळे या तरुणांना दूरदृष्टीने विचार करुन काही मुलभूत आव्हाने स्वीकारणे गरजेचे आहे. तरुण वर्गाविषयी केला जाणारा विचार व त्यांना देण्यात येत असलेले महत्त्व भिन्न प्रकारचे आहे. समाजाचा विचार करताना धर्म, वर्ण पंथ, जात या नुसार वर्गीकरण केले जाते. वयोमानानुसार समाजाची विभागणी करुन युवकांचा एक वेगळा सामा जिक गट निर्माण करण्याची प्रवृत्ती नव्याने दिसून येत आहे. त्याचप्र माणे तरुण माणसांनाही आपण युवक म्हणून कोणीतरी वेगळे आहोत, वेगळी सामाजिक जबाबदारी आपल्यावर आहे व समाज परिवर्तनाच्या कामात आपल्याला विशेष स्थान आहे. अशी जबाबदारीची जाणीव होत आहे. परंतु ही जबाबदारी पार पाडत असतानाच काही गोष्टींचे भान तरुण वर्गाने ठेवले पाहिजे, या मध्ये प्रामुख्याने नैतिकता, नाविन्यपूर्ण

विचारसरणी व आदर्श ध्येयवाद अंगी स्वीकारला पाहिजे. आपण असे जीवन जगणार आहोत, जी कार्ये करणार आहोत ती इतर कुणाला लक्षात ठेवावेशी वाटली नाहीत तरी काळ व इतिहास यांना मात्र निश्चितच नोंद घ्यावी लागेल. इतिहास हा संदर्भासाठी असतो. जेव्हा नवीन पिढी भूतकाळाची पाने उलगडून पाहिले असता तेव्हा वर्तमान कालीन इतिहास त्यांना समोर येईल. माणूस अनुकरणप्रिय जरुर आहे. मात्र ब-याचवेळेस वाईट गोष्टींचे अनुकरण जास्त होते. उद्या एखादया चुकीच्या प्रथेचा पायंडा पडू नये याची खबरदारी घेणे हे प्रत्येक तरुण पिढीसमोरील प्रथम आव्हान आहे. त्यामुळे आज ज्या मार्गावरुन आपण जात आहेत तो मार्ग नैतिक किंवा अनैतिक हे अभ्यासने गरजेचे आहे.

असे निकष लावताना कोणता आधार घ्यावयाचा? कोणला वाईट म्हणावे व कोणाला चांगले? कशापेक्षा काय बरं, अगर कशापेक्षा काय वाईट आहे ?आपल्या हाती फक्त समांतर आयुष्य थोडेच आहे, शिवाय स्वतःची मते देखील बदलत असतात.विषेशतः परतीचे वारे वाहू लागले, की त्यांची चाहूल संवेदनशील माणसांना ताबडतोब लागते आणि मग सिंहांवलोकन सुरु झालं की सगळं उलथापालथ झाल्याचे दिसून येते. आशा वेळी आदर्श उपयोगी पडतात. जगातील प्रत्येक माणूस नियतीने दिलेल्या जबाबदा-या आणि कर्तव्य पार पाडतात. तो आदर्श आहे का नाही हे त्याने केलेल्या कार्याच्या यशावर अवलंबून असते.

आदर्शवादानेच बघायला गेले तर प्रत्येक माणूस हा आपल्या परिने एक आदर्श जीवन जगण्याचा प्रयत्न करीत असतो. मला असे म्हणावे वाटते की, "We don't need followers, we need Ideals" पण तरी सुध्दा मान्यता पावलेले आदर्श व्यक्तिमत्व नेहमीच आपणास

उपयुक्त असतात. भारतीय युवकांच्या दृष्टीकोनातून स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी आणि आजच्या काळातील म्हटले तर डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा आवार्जून उल्लेख करता येईल. यानांच आदर्श का म्हणावे ? यामागील काही महत्त्वाची कारणे विशद करणे मला महत्त्वा चे वाटते. त्यांचे नुसते ज्ञानच प्रचंड आहे. एवढेच नाही तर त्यांची नैतिकता व सखोल विचार करण्याची प्रवृती महत्वाची आहे.गौतम बुद्धांनी केलेल्या उपदेशानुसार "मी सांगतो आहे म्हणून माझ्यावर विश्वास ठेवू नका, धर्मग्रंथात आहे म्हणून आंधळेपणाने स्वीकार करु नका तर सर्व विचार तुमच्या बुध्दिवर तपासून पहा आणि योग्य व अयोग्य काय तेठरवा". अशा उपदेशाचे त्यांनी तंतोतंत पालन केले. साधे जीवन जगत उच्च विचारसरणी जोपासली.त्यांची कार्य करण्याची पध्दत, प्रामाणिकपणा,कसोटी,जगाकडे व जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन,काही तरी नवीन निर्माण करुन दाखवण्याची जिद्द, प्रयत्न, कष्ट यांच्या जोरावर आपण जगाला काहीतरी देणे लागतो ही भावना हे त्यांच्या व्यक्तीमत्वाच्या अनेक पैलूच्यां पैकी एक आहे.असे आदर्श व्यक्तीमत्व प्रत्येक घराघरात पोहचविण्याचा प्रयत्न तर करणार आहे. पण रुजवण्याचा व निर्माण करण्याचा प्रयत्न देखील युवकांना प्रथम करावा लागेल. असा धाडशी प्रयत्न करताना काही आव्हाने स्वीकारवी लागतील. उदाहरणार्थ प्रबोधन, शिक्षण, बेरोजगारी सारखी युवा वर्गा समोरील मोठया समस्या, आदर्शवाद व वैचारिक जडणघडण इत्यादी विचारात घेणे आवश्यक आहे.आजची पिढी रुळ सोडून धावते आहे असे स्वर कानी पडतात.अशा या द्रुतगतीने धावणा-या रेल गाडीला एका उत्तम कुशल चालकांची गरज आहे तो चालक म्हणून आपल्याला युवा

प्रबोधनाकडे पाहता येईल. १९ व्या शतकातील ज्या प्रकारची युरोपची प्रगती विकास झालेला दिसतो. त्यामध्ये विषेशतः पण प्रबोधनामुळे झालेले चमत्कार ठळकपणे दिसून येतात. भारतामध्येही असे प्रबोधन गेल्या काही वर्षात वेगाने झाले. पण यासाठी परंपरागत पार्श्वभूमीवर सांगड होती त्यामुळे असे प्रभोदन फारसे गांर्भीयाने झालेली नाही. त्यामुळे त्यांचा सामान्य तरुणावर फारसा प्रभाव दिसून येत नाही. यासाठी ग्रामीण भागातील तरुणांना प्रबोधीत करणे हे एक महत्त्वाचे जिद्दीचे मोठे असे आव्हान म्हणता येईल. या प्रबोधनाचे फलीत म्हणून आपणास युवकांच्या चळवळीकडे बघता येईल. स्वातंत्र प्राप्तीनंतर देशव्यापी पातळीवर फक्त संपाचे हत्यार उपसलेले दिसत आहेत. युवकांना राजकारणीलोक केवळ मतदार म्हणून पहातात राजकीय फाय दयासाठी त्यांचा उपयोग अनेकवेळा करुन घेतात. त्यांच्या समस्यांच्या कडे सा-या अर्थाने पाहिलेच जात नाही. युवा संघटना मग ती कुठलीही असो,अभाविप किंवा इंदिरा युवक कॉग्रेस, विदयापीठांच्या किंवा विधान सभा निवडणुकीपर्यंत त्यांचे कार्यक्षेत्र मर्यादित रहाते.युवकांचे सामाजिक प्रबोधन,रोजगार उपलब्धता,व्यक्तिमत्व विकास यांकडे दुर्लक्ष केले जाते ही परिस्थिती हाताबाहेर जाण्याआधीच युवकांना जागृत करणं शक्य त्यांच्या इच्छाशक्तीला प्रबळ चालना देणे नैमित्तीक आहे.तरुण पिढीला धेयवादी आदर्शवादी बनविण्याची ताकद त्यांच्या इच्छाशक्तीच्या विकासात आहे. म्हणजेच......

“ध्येयाच्या वेदना मनाला होऊ दे
वार तुझ्या प्रत्येक क्षणास होऊ दे,
अशक्य सुध्दा म्हणेन शक्य आहे,
इतका गर्व तुझ्या बुध्दीच्या मी पणास होऊ दे !"

जेव्हा तरुणपिढी ध्येयाने प्रेरित होईल आणि संकटांना सामोरे जाण्या साठी निधडी छाती निर्माण होईल. आकाशाला गवसणी घालण्याचे सामर्थ्य अंगी प्राप्त होईल. त्यावेळेस उज्वल भारतवर्षाची निर्मिती होवू शकेल. ही जबाबदारी सहन करण्याच्या शक्तीचे जबरदस्त आवाहन नियतीने तरूणासमोर ठेवले आहे. या आव्हानाला सामोरे जाताना दुसरे पुढे येणारे आवाहन म्हणजे समाजकारण राजकारणात युवाशक्तीचा सहवास होय. ढोबळ मानाने युवा वर्गाचा विकास हाच उदयाच्या समा जाचा विकास आहे. फायदयाच्या राजकारणापासून स्वतःला दूर ठेवणे समाजाच्या फायदयासाठी कार्य करणे हेच योग्य ठरते. पाश्चीमात्य युवक चळवळीपासून एकांगी असमज धडा घेणारे मूठभर विदयार्थी, दिशाहिन तरूण तथाकथीत संतप्त तरूण साहित्यिक राजकीय पक्षांच्या अधिण असलेल्या गटांच्या मोहजालातून बाहेर पडणे आणि या घटकांना सरळ करणे कालप्राप्त ठरेल. सामाजिक क्रांती संस्कृती यांचा सरळ संबंध आहे. काळानुरूप विज्ञानाची कास धरून विकास साध्य करताना सांस्कृतिक वारसा जतन करावा लागतो. भारताचा विचार करता जिथे ७० टक्केहून अधिक जनता खेडयामध्ये राहते तेथे दर्जेदार ग्रामव्यव स्थेचा वारसा जतन करणे सद्य परिस्थितीतील ग्रामसंस्कृतीची जपणूक करणे, त्या काळानुसार मात्र योग्य बदल करणे हे सुध्दायुवकांच्या खांदयावरील कर्तव्यच आहे. महात्मा गांधीनी युवक हे आव्हान स्वीकार तील का ? यानिबंधात असे लिहिले आहे की, " देशातील युवक जर त्यागमय जीवनास तयार होतील तरच ग्रामप्रधान संस्कृतीतील दोषांचे निवारण करण्याचे मी सुचविलेले उपाय कार्यान्वयीत होऊ शकतील. तसेच ते करू इच्छीत असतील तर युवकांना त्याच्या जीवनक्रमात अमूलाग्र बदल घडवून आणावा लागेल". शहरी भागातील तरूणांनी इतर

ग्रामीण भागातील युवकांना शिक्षित संघटीत करणे,तेथील जनतेशी निरोगी संबंध निर्माण करण्या सारख्या प्रयत्नांवरच इतर आव्हाने पेलण्याची क्षमता येऊ शकेल. खेडयातील तरूणांच्यामध्ये संघर्ष करण्याची भावना प्रज्वलित करणे हे त्यांच्या प्रगतीतील महत्वाचे अस्त्र ठरू शकेल म्हणून या संदर्भात कवि कुसुमाग्रजांच्या खालील काव्यपंक्ती वरून असे लक्षात येईल की,

“संघर्षाच्या आधीच हार मानलीस तू,<br>
कर्तबागारी आधीच गमावलीस तू,<br>
जीवन हा संघर्ष आहे, तोच नको म्हणतोस तू ,<br>
अरे जगण्या आधीच संपलास तू !”

अश शक्तीला वेळेआधीच नष्ट होण्यापूर्वीच एका परमशक्तीमध्ये परावर्तीत करणे हे युवकांच्या अग्रक्रमात असणे आवश्यक आहे. ब-याच वेळा शिक्षण घेऊन कांही उद्‌योग किंवा नोकरी नसल्याने वफैल्यग्रस्त असणा-या तरूणांच्यामध्ये जिद्द निर्माण करणे हे ही या प्रयत्नामध्ये ओघाने आलेच आहे. नैतिकता, वैचारिक जडणघडण किंवा प्रबोधन, कांहीही असो, या सर्वांनाच असे भांडवल हे शिक्षणातूनच उपलब्ध करून दिले जाते.शिक्षण म्हणजे योग्य अयोग्य यामधील फरक अवगत होणे व्यवहार ज्ञान प्राप्त करणे. युवकांना भेडसावणारा नित्याचा प्रश्न म्हणजे काय करावेआणि काय करू नये ? हा प्रश्न सोडविण्यासाठी शिक्षण, अनुभव कौशल्य यांची सांगड घालणेमहत्वाचे आहे. ब-याचदा माहितीचा अभाव हे कारण आर्थिक विकासाच्या मागे दिसून येते. माहितीतंत्रज्ञानाचा वापर सुयोग्य पद्धतीने हा तरूण वर्ग करताना दिसून येत नाही. स्वतःचा विकासस्वतःच करणे त्यासाठी लागणारे भांडवल शिक्षणातून निर्माण करणे गरजेचे आहे. या कलेचा सर्वोत्कृष्ट उपयोग

युवकांच्या बेरोजगारीच्या समस्येवर करता येईल. स्वतःचा आर्थिक विकास, सामाजिक बांधिलकी, देशाचा विकास , स्वतःच्या ज्ञानात भर घालणे श. बाबींना जोडणारा दुवा म्हणजे स्वयंरोजगार होय.स्वयंरोजगार हा इतर विकासांबरोबर इतर तरूणांनारोजगारांच्या संधी उपलब्ध करून देतो. त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत करतो. त्यांच्या भरभराटीला चालना देतो. उत्तम व्यावसायिकतेचे लक्षण म्हणजे भरभराट होय. भारतीय युवक याबाबतीत ब-याचअंशी उदासिन दिसून येतात. रोजगार स्वयंरोजगार यासंदर्भात स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांची आकडेवारी फारच बोलकी आहे. उद्‍योगधंदा चालविताना येणारी महत्वाची अडचण म्हणजे व्यवस्थापन होय. व्यवस्थापनामध्ये तरबेज होणे हे केवळ व्यवसायाच्या दृष्टीने  नव्हे तर नित्य जीवनातसुध्दा अत्यावश्यक आहे. स्वावलंबनाकडे अग्रेसर होण्याचा सर्वात सोपा मार्ग युवकांच्या समोर कांही अंशी आव्हान तर ब-याचअंशी आद्‍य कर्तव्य मानले जाते. सर्वात शेवटची तितकीच महत्वाची बाब म्हणजे कर्तव्य पालन होय.स्वार्थातून परमार्थाकडे जाण्याच्या मार्गाच्या दृष्टीकोनातून पाहताना जर आपली कर्तव्ये आपण योग्य प्रकारे पार पाडली तरच परमार्थ करण्यासाठी वेगळे विशेष  श्रम घ्यावे लागत नाहीत. देश आणि त्यांची प्रगती ही सर्वांच्यावर अवलंबून आहे. त्यावेळी असे म्हणून चालणार नाही की, मी एकटाच आहे का हे सर्व करणारा ? प्रत्येकाचा हातभार विकास कार्यासाठी आवश्यक असतो. त्यासाठी प्रत्येकांनी आपली कर्तव्ये ओळखली पाहिजेत आणि कर्तव्यपुर्तीला प्राधान्य देवून तिला तन,मन, धनाने अर्पण केलेपाहिजे.  गरज आहे ती प्रबळ इच्छाशक्तीची आणि जिद्दीने तडफडून पेटून उठण्यची. अजूनही वेळ गेलेली नाही.

# मराठी मातीत रुजतंय कडकनाथाचं(ब्लॅक गोल्ड) वाण!

अरुण कटाळे :८०८०७७४६४७ श्री कडकनाथ पोल्ट्री फार्मर

एका कोंबडीमागं मिळतात तब्बल ५,०००-७००० रुपये आणि एका अंड्याचा भाव आहे तब्बल ५० रुपये... हा काही कुठल्या फाईव्ह स्टार हॉटेलमधल्या कोंबडीचा भाव नाही, तर हा दर मिळतोय 'कडकनाथ' जातीच्या कोंबडीच्या वाणाला!मूळ मध्य प्रदेशातील आदिवासी भागातील हे वाण आता महाराष्ट्राच्या मातीतही रुजायला लागलंय. त्याचं मार्केटींगही आता चांगलं होतंय.ठिकठिकाणच्या हॉटेल,धाब्यांवर कडकनाथ चिकन मिळेल, असा बोर्ड वाचायला मिळतो.त्यामुळं बऱ्याच जणांना 'कडकनाथ' ही काय भानगड, असा प्रश्न पडतो देशी "कडकनाथ'ची तऱ्हाच न्यारी!विविधरंगी कोंबड्या अन् लालजर्द तुर्रेबाज कोंबडे सर्वज्ञात आहेत. मात्र, "कडकनाथ' ही अशी कोंबडीची देशी जात आहे, की जिचे मांस, त्वचा, हाडे आणि रक्तही काळेशार आहे.मध्य प्रदेशातील झाबुवा, धार व राजस्थानच्या उदयपूर, बन्सवारा, डुंगरपूर या भागांतील आदिवासींकडे ही कोंबडीची जात आढळते.

आजच्या स्पर्धेच्या युगामध्ये अयोग्य आहार खाण्याचे बिघडलेले वेळापत्रक नैराश्य, प्रदूषण अशा अनेक कारणामुळे मानवी जीवन निरनिराळ्या आजारांची घेरले आहे.अशावेळी माणूस बाजारात उपलब्ध असणारी महागडी  औषधे घेऊन शरीराला तात्पुरता आराम देण्याकडे लोकांचा कल वाढला आहे.अशावेळी अतिशय दुर्मिळ असणारी कडकनाथ नावची देशी कोंबडीची जात मनुष्यास वरदान ठरत आहे .

कडकनाथ काय आहे . कोंबडी दिसयला पूर्ण काळी मांस ,त्वचा हाडे  व रक्तही काळेच मध्यप्रदेश मधील झांबूआ व राज्यस्थान मधील

बांसवार डोंगरपूर आणि उदयपूर या आदिवासी भागात आढळणारी कोंबडी तिथे तिला कालीमासी म्हणून संबोधिले जाते.या कोंबडी मध्ये विस्मयकारी औषधी युक्त गुणधर्म असल्यामुळे तिला भरपूर मागणी आहे.बंगळूर येथील अन्न परिक्षण संशोधन संस्थेने कडकनाथच्या मांसावर व अंड्यावर औषधी गुणधर्म बाबत संशोधन करून प्रमाणित करण्यात आले आहे .

या कोंबडीमध्ये विस्मयकारी औषधीयुक्त गुण आहेत. पांढरे कोड, रक्ताचा कर्करोग, हृदयरोग व त्वचेचे रोग यावर तिचे मांस गुणकारी असल्याचे सांगितले जाते. या कोंबडीचे मांस काळ्या रंगाचे असल्याने तिला "कालामासी' असेही संबोधले जाते.

**बंगळूरमध्ये संशोधन**

बंगळूर येथील अन्न परीक्षण संशोधन संस्थेत या जातीच्या मांसावर व औषधी गुणधर्माबाबत संशोधन करण्यात आले आहे. या कोंबडीची त्वचा, मांस व हाडांमध्ये मेलॅनिन नावाचे द्रव्य (पिगमेंट) अधिक प्रमाणात असल्याने रक्त,मांस व सर्व अवयव काळ्या रंगाचे आढळतात. यालाच "फायब्रोमेलॅनोसिस' असेही म्हटले जाते. मांस व सर्व अवयव काळे असले तरी चव अतिशय रुचकर असल्याने मध्य प्रदेश व राजस्थानमध्ये या कोंबड्या अतिशय महाग दराने विकल्या जातात.

**आयुर्वेदिक गुणधर्म:**

- कडकनाथचे मांस व अंडी खाल्याने शरीरातील रक्तदाब कमी होतो.
- कोड फुटलेले कमी होते
- हृदयविकारवर गुणकारी

•मासंमध्ये पुरुषत्वाचे प्रणाम जास्त आहे. मांस खाल्याने पुरुषत्ववाढते.

•दमा , अस्थमा ,टी.बी या आजारांवरही गुणकारी

•प्रोटीन आणि लोहाचे प्रमाण २५-७० टक्के

•अंडी डायट म्हणूनही खाल्ली जातात

•मांसामध्ये प्रथिनाचे  प्रमाण अधिक आहे .

•अंडी देखील स्वादिष्ट असून प्रथिनांचे प्रमाण भरपूर आहे .

•कडकनाथच्या हाडांमध्ये (मेल्यानीन) नावाचे द्रव्य .पिंगमेट अधिक प्रमाणात असल्याने सर्व अवयव काळ्या रंगाचे असतात यालाच (फायब्रोमेलॅनोसिस )असेही म्हणतात .

•या कोंबडीमध्ये इतर कोंबडीची तुलनेत २१ % लॅबीलिक ॲसिडचे प्रमाण अधिक २४ टक्के असल्याने हृदयाला रक्त पुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्या जाड होवून आतील मार्ग अरुंद होण्याचे प्रमाण कमी होते . परिणामी हृदयविकार होत नाही .

•मांसमध्ये (कोलेस्टेरॉलचे) प्रमाण इतर कोंबडीच्या तुलनेत (३२ मिलीग्रॅम) प्रति १०० ग्रॅम एवढे आहे.

यामुळेच या कडकनाथला जगभरातून मोठी मागणी आहे . ढाब्यावर ४०० ते ५०० रुपये प्रति प्लेट पंचतारांकित हॉटेल मध्ये ८०० ते ९०० रुपये प्लेट प्रमाणे विक्री केली जाते . खुल्या बाजारात कोंबडी १००० ते १२०० प्रति किलो आणि घाऊक बाजारात ७०० रुपये प्रति किलो दराने विक्री होते . विदेशात चार ते पाच हजार रुपये प्रति किलो प्रमाणे विकले जाते  त्याची अंडीही खुल्या बाजारात ५० रुपये प्रति अंडे या प्रमाणे विकले जाते . यावरून आपल्याला अंदाज आला असेल यांची मागणी व दर का गगनाला भिडले आहेत . इतक्या महागड्या भावाने त्याचे मांस खाणे आपल्या सारख्या सामान्य माणसाला

परवडणारे नाही .खायचे झाले तर इतक्या लांबून जाऊन घेऊन येऊन खाणे तर शक्यच नाही ?कडकनाथ कोंबडी मिळवण्यासाठी आपल्यला मध्यप्रदेश किंव्हा उदयपूरला जाण्याची गरज नाही .

आपल्यासाठी एक सुवर्णसंधी घेऊन येत आहोत.आपल्याकडे कडकनाथ जातीची अंडी देणारी कोंबडी,पिल्ले व अंडी उपलब्ध आहेत. जवळच्याच कडकनाथच्या श्री कडकनाथ जातीची फार्मला ,सुळे येथे भेट देऊन स्वत:ला शक्य त्या प्रमाणे अंडी देणारी कोंबडी व पिल्ले खरेदी करून स्वतःसंगोपन करून घरच्या घरी अंडी मिळवू शकता त्यासाठी एक वेळ अवश्य भेट द्या .

अधिक माहितीसाठी :

**दिलीप भोगुलकर :९५९४२५६८८८**




# चला मधुमेह रोखूया !
# निरोगी जीवन जगूया !

• DIAT • AYURWEDA
• MODERN DIAGNOSTICS
• PANCHKARMA • LIFESTYLE MODIFICATION

## मधुमेहाशी सामना करण्यासाठी सर्वकष उपाय !

डाएट,आयुर्वेदिक औषधं,जीवनशैलीत सुधारणा,
पंचकर्म व तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली
अत्याधुनिक चिकित्सा या पंचसूत्रीने
मधुमेहासारख्या प्रबळ रोगाचा मुकाबला करा !

**आयुष्यातील प्रत्येक क्षण गोड करूया !**
**क्रियाशील जीवनाचा आनंद लुटूया !**

**' आयुर्वेदिक उपचारांनी रुग्णांचे ह्रदय सशक्त होण्यास मदत होते !'**




माधवबाग

हॉल नं 203 ,सिद्धीविनायक कॉम्प्लेक्स , आपला बाजार शेजारी , आजरा रोड ,गडहिंग्लज.

संपर्क - 7447479580 , 7447479581


ज्ञानग्रुप परिवारातर्फे
दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा....
दिव्याच्या प्रकाशात
उजळला निसर्ग
सुख समृध्दी घेवून
आला दिपावली पर्व....